दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -३०० | गुरुवार दि.०९ जुलै २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily | Marathi | Year-6th | Issue-300 | Thursday, Dt.09 July 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# महाराष्ट्रात ‘व्यवहारिक मराठी’ अनिवार्य

## प्रवासी सुरक्षेसह भाषिक स्वाभिमानाचा नवा अध्याय, महाराष्ट्र मोटार वाहन नियमात सुधारणा

मुंबई /प्रतिनिधी

मराठी ही कोणाला दूर करणारी भाषा नाही, तर माणसाला माणसाशी जोडणारी भाषा आहे. या भावनेतून महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांसाठी व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४, २२, ७८ आणि ८५ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या असून, १६ ऑगस्ट २०२६ पासून या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यासंदर्भातील अधिसूचना ८ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधिमंडळात निवेदनाद्वारे दिली.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची, समाजसुधारकांची, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी विचारांची आणि समृद्ध मराठी संस्कृतीची भूमी आहे. रोजगाराच्या शोधात देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे महाराष्ट्राने नेहमीच खुले मनाने स्वागत केले आहे. मात्र, राज्यातील जनतेशी संवाद साधण्या इतपत व्यवहारिक



### महाराष्ट्राच्या मातृभाषेलाही मनापासून स्वीकारावे

■ महाराष्ट्रात रोजगार करणाऱ्या प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगावा; मात्र महाराष्ट्राच्या मातृभाषेलाही मनापासून स्वीकारावे. मराठीचा सन्मान म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, इतिहासाचा आणि जनतेच्या भावनांचा सन्मान होय, असा संदेश या निर्णयाच्या अंमलबजावणीतून दिला जात असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

### मराठीचे प्रशिक्षण वर्ग

कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाचा मराठी भाषा विभाग यांच्या सहकार्याने हजारो अनुभवी शिक्षकांची फळी तयार करण्यात आली. राज्यभरातील विविध प्रादेशिक परिवहन कार्यालये, प्रशिक्षण केंद्रे तसेच चालकांच्या सोयीच्या वेळेनुसार व्यवहारिक मराठीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मराठीचे ज्ञान असणे ही केवळ कायदेशीर अट नसून सामाजिक बांधिलकी देखील आहे.

हा निर्णय कोणत्याही भाषे विरोधात नसून कोट्यवधी प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी, सुलभ संवादासाठी आणि ग्राहकाभिमुख सार्वजनिक सेवा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे. चालक आणि प्रवासी यांच्यातील स्पष्ट संवादामुळे गैरसमज कमी होतील, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळेल आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थे वरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी परिवहन विभागाने मागील काही महिन्यांपासून राज्यव्यापी प्रशिक्षण मोहीम राबविली आहे.

या प्रशिक्षणासाठी दैनंदिन सेवेत उपयुक्त ठरणारी वाक्यरचना, प्रवाशांशी नम्र संवाद, दिशा, ठिकाणे, भाडे, आपत्कालीन प्रसंग तसेच महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांशी प्रभावी संवाद साधण्यासाठी विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. सोप्या पुस्तिका, संवाद माला आणि प्रशिक्षण साहित्याच्या माध्यमातून मराठी शिकणे सहज, सोपे आणि आनंददायी व्हावे, यावर विशेष भर देण्यात आला आहे.

# विधानभवनात शरद पवारांची पक्षाच्या आमदारांसोबत बैठक



## रोहित पवार गैरहजर, सत्तेत सहभागी होण्यावरुन नाराजी ?

मुंबई : राज्यात गेल्या दोन दिवसांपासून शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेत सहभागी होणार असल्याची चर्चा सुरू आहे. याबाबत, महायुतीत आता कुणीही नवीन पक्ष येणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मात्र, अद्यापही राजकीय वर्तुळात याची चर्चा होत असून आज राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांनी पक्षाच्या आमदारांची बैठक घेतली. या बैठकीत, आमदारांशी थेट शरद पवार यांनी संवाद साधला. मात्र, आजच्या

पान २ वर..

### रोहित पवार बैठकीला अनुपस्थित

■ राष्ट्रवादीतील पक्षाच्या वरिष्ठ नेत्याकडून कोणताही वेगळा निर्णय घेऊ नका, सत्तेत सहभागी होण्याची योग्य वेळ आल्याचे संकेत बैठकीत देण्यात आले आहेत. या बैठकीनंतर रोहित पवार यांनी आज शरद पवारांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीला उपस्थित राहणं टाळलं. रोहित पवार यांनी बुधवारी सकाळी ट्विट करत माहिती दिली होती की आपण शरद पवार विधिमंडळात येणार असल्यामुळे शिक्षकांच्या आंदोलनाला उशिरा पोहचू. मात्र, ऐनवेळी शरद पवारांच्या उपस्थित पार पडलेल्या बैठकीला रोहित पवार उपस्थित राहिले नाही त्यांनी शिक्षकांच्या आंदोलनात उपस्थित राहण पसंद केलं.

# राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय

## ■ पालघरला ’रेड’ तर मुंबईसह कोकणाला ’ऑरेंज’ अलर्ट

मुंबई /प्रतिनिधी

राज्यात मान्सूनचा जोर पुन्हा एकदा वाढला असून, येत्या काही दिवसांत महाराष्ट्राच्या विविध भागांत पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने पुढील पाच दिवसांचा सविस्तर अंदाज जाहीर केला असून, विशेषतः कोकणात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईसह अनेक जिल्ह्यांसाठी प्रशासनाकडून विविध स्तरांचे अलर्ट जारी करण्यात आले आहेत.

कोकणात पावसाचा जोर वाढणार

हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, किनारपट्टीच्या भागात पावसाचा जोर सर्वाधिक राहील.

रेड अलर्ट: आज पालघर जिल्ह्यात काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून, येथे




प्रशासनाने ’रेड अलर्ट’ जारी केला आहे.

ऑरेंज अलर्ट: मुंबई, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता असल्याने या जिल्ह्यांना ’ऑरेंज अलर्ट’ देण्यात आला आहे.

येलो अलर्ट: सिंधुदुर्ग जिल्ह्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा

पान २ वर..

# पातळगंगा नदीतून ३००० सिलेंडर वाहून गेले, टाक्या घेण्यासाठी नागरिकांची झुंबड



जिल्हाधिकाऱ्यांचं आवाहन

रायगड : मुंबई, कोकणासह महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत मुसळधार पाऊस पडला असून अनेक दुर्घटना घडल्याचं समोर आलं आहे. रायगड जिल्ह्याच्या खालापूरमध्ये एचपीसीएल कंपनीच्या ३००० सिलेंडरच्या टाक्या वाहून जाण्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे पाताळगंगा नदीमधून वाहून जाणारे सिलेंडर नागरिकांनी गोळा केल्याचा प्रकारही समोर आला

पान २ वर..

# इराणसोबतचा करार रद्द

अंकारा : तुर्कीची राजधानी अंकारा येथे झालेल्या नाटो शिखर परिषदेदरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबाबत एक अत्यंत खळबळजनक आणि मोठी घोषणा केली आहे. अमेरिका आणि इराणमधील तणाव कमी करण्यासाठी पाकिस्तानने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या सर्व विनवण्या आणि प्रयत्न पूर्णपणे निष्फळ ठरले आहेत. ट्रम्प यांनी इराणसोबतचा सामंजस्य करार आता कालबा झाला असून तो रद्द केल्याचे जाहीर केले आहे.



नाटो परिषदेत पत्रकारांशी बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका-इराण तणावावर रोखठोक भूमिका मांडली. ते म्हणाले मला वाटते की इराणसोबतचा सामंजस्य करार आता पूर्णपणे संपला आहे. अलीकडील घडामोडींनंतर दोन्ही देशांमधील या कराराने आपले महत्त्व गमावले आहे. अमेरिका आणि इराणमधील परिस्थिती अशा टप्प्यावर पोहोचली आहे की, या कराराचे भवितव्य आता संपलेले मानले पाहिजे. आपल्या आक्रमक शैलीत ट्रम्प पुढे म्हणाले, आम्ही काल रात्री इराणमधील अत्यंत धोकादायक व्यक्तींवर एक अतिशय शक्तिशाली हल्ला केला आहे. ही कारवाई अमेरिकेच्या सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक होती आणि ही मोहीम पूर्ण ताकदीनिशी राबवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इराणी नेतृत्वावर थेट निशाणा साधत ट्रम्प म्हणाले, ते आजारी आहेत, त्यांच्यात काहीतरी नक्कीच गडबड आहे. ट्रम्प यांच्या या विधानामुळे पश्चिम आशियातील लष्करी आणि राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

# तुकाराम मुंढेंचा दणका!

## मुंबईतील प्रसिद्ध रुस्तम आईस्क्रीमचा परवाना रद्द, उंदीर आणि माशांचा वावर;१६ ठिकाणी छापेमारी




मुंबई : आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी प्रसिद्ध असलेले आयएएस अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारताच अन्न भेसळ आणि अस्वच्छतेविरुद्ध मोठी मोहीम उघडली आहे. एफडीएच्या पथकाने एकाच दिवशी तब्बल १६

पान २ वर..

# मुस्लीम आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात



नवी दिल्ली : इस्लाम धर्म स्वीकारणारी व्यक्ती मागासवर्गीय आरक्षणाच्या लाभांसाठी पात्र नाही, असा निकाल मद्रास उच्च न्यायालयाने दिला होता. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निकालाला आव्हान देत तामिळनाडूचे थलपथी सी जोसेफ विजय यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे.

तामिळनाडू सरकारने मागास वर्ग, अति मागास वर्ग, अधिसूचित समुदाय किंवा अनुसूचित जातीमधून इस्लाम धर्म स्वीकारलेल्या लोकांना मागास वर्ग (मुस्लिम) सामील करण्याचा आदेश जारी केला होता. तत्कालीन एम. के. स्टॅलिन सरकारनेही जात प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात केली. ज्या मुस्लिम जातींना हे आरक्षण दिले जात होते, त्यांमध्ये अन्सार, दख्खनी मुस्लिम, दुबेकुला, लब्बै, रौथर, माराकायर,

पान २ वर..

# वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पान सेंटर

## नगर नाका बस थांब्यांच्या जागेत बदल, शिवराजचा थांबा शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या उत्तर बाजूला हलवला

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील वाढती वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि वाहनधारकांसह पादचाऱ्यांना दिलासा देण्यासाठी वाहतूक पोलिस आणि एसटी महामंडळाने संयुक्तपणे मंगळवारपासून मोठे बदल केले आहेत. त्यानुसार, शहरातील अत्यंत गजबजलेला शिवराज पान सेंटर येथील बस थांबा शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या उत्तर बाजूला तर नगर नाका येथील थांबा बांधकाम कार्यालयाजवळ हलवण्यात आला आहे. याशिवाय जिल्हा रुग्णालय गेट समोरील रिक्षा पॉइंट बार्शी रोडवरील कमानीजवळ स्थानांतरित करण्यात आला आहे. वारंवार होणाऱ्या कोंडीला कायमचा फुलस्टॉप लावण्यासाठी प्रशासनाने हे धाडसी पाऊल उचलले आहे. शहरातील वाहतुकीचे मुख्य केंद्र असलेल्या शिवराज पान सेंटर चौकात दररोज छत्रपती संभाजीनगर, जालना, धुळे आणि सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरून धावणाऱ्या २०० हून अधिक बसेस थांबत होत्या. चौकातील पूल आणि



नाल्यामुळे येथे रस्ता अरुंद होता आणि बसची वाट पाहणारे प्रवासी त्याच अरुंद जागेत थांबत होते. परिणामी वाहतूक कोंडी होत होती. पोलिस निरीक्षक आणि एसटी अधिकाऱ्यांनी बस थांब्याची पाहणी केली. शहरातील प्रमुख चौक आणि जिल्हा रुग्णालय परिसरात होणारी वाहतूक कोंडी प्रवाशांसह रुग्णवाहिकांसाठी मोठी अडचण ठरत होती. ही कोंडी कायमची फोडण्यासाठीच एसटी महामंडळाच्या

पान २ वर..


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय....

# विकास की विनाश ?

देशाची आर्थिक राजधानी मुंबईत पावसाने आठवडाभरापासून हाहाकार माजवला. नेहमीप्रमाणे मुंबईची 'तुंबई' होऊन जनजीवन पूर्णत: विस्कळीत झाले. मुंबईसह राज्याच्या अनेक भागात पावसाने थैमान घातले. रेल्वे, बससेवा, रस्ते या दळणवळणाच्या सुविधांवर परिणाम झाला. महापालिकेतील सत्ताधा-यांनी मुंबईतील सर्व पावसाळी कामे पूर्ण झाल्याचा दावा केला होता. महापौरांनी भेटी दिल्याचे दाखवले गेले. पण पहिल्याच पावसात मुंबई महानगरपालिकेचे पितळ उघडे पडले. मान्सूनपूर्व नियोजनबद्ध तयारी न केल्याचा परिणाम जनतेला भोगावा लागला. पावसामुळे मनाला वेदना व्हाव्यात अशा अनेक घटना घडल्या. पहिल्याच पावसात सुमारे १४ लोकांचे जीव गेले. काही जणांना झाड कोसळून, भिंत पडून, मॅनहोलमध्ये पडून जीव गमवावा लागला. हे सारे केवळ अपघात नाहीत, तर प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे द्योतक आहेत. यंदा झाडे कोसळण्याच्या अनेक घटना घडल्या. गत चार वर्षे मुंबई महापालिकेवर प्रशासकीय राजवट होती, पण भाजपवाले ठाकरेंच्या शिवसेनेवर आरोप करण्यात मश्गुल आहेत. '२५ वर्षांचा हिशेब काढू' अशी धमकीही देण्यात आली. पण त्या सत्तेत आपणही सहभागी होतो याचा सोयिस्करपणे विसर भाजपवाल्यांना पडला. मुंबईत जशा घटना घडल्या तशा राज्याच्या अन्य भागातही घडल्या. पूर येणे, दरड कोसळणे अशा घटनांमुळे रस्ते, महामार्ग बंद झाले.

मोठा गाजावाजा करत बांधण्यात आलेला मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' पहिल्याच पावसात 'मिसिंग' झाला. सुमारे ७ हजार कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या मिसिंग लिंकच्या निकृष्ट बांधकामाचे दर्शन अवघ्या दोन महिन्यांतच झाले. आधी गळती, खड्डे आणि आता दरड कोसळल्याने मिसिंग लिंक बंद ठेवण्याची वेळ आली. या प्रकल्पाच्या कामाच्या गुणवत्तेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकल्पात जो हजारो कोटी रुपयांचा चुराडा झाला तो पैसा जनतेचा होता. मुंबईत मुसळधार पावसामुळे झाडे कोसळण्याच्या सर्वाधिक घटना घडल्या. या केवळ नशिबाचा भाग म्हणता येणार नाहीत. अशा घटना का घडल्या याच्या मुळाशी जावे लागेल. झाडांची नियमित पाहणी करणे, धोकादायक झाडांची छाटणी करणे, वेळेत आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, यात मनपा 'एन'विभागाच्या उद्यान विभागाकडून अक्षम्य हलगर्जीपणा झाला का ते सर्वप्रथम तपासले पाहिजे. दरवर्षी पावसाळ्यात अशा घटना घडत असतात हे माहीत असताना दुर्घटना घडल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा, पावसाळ्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे आवश्यक असते. नागरिकांच्या जीविताची सुरक्षा ही पालिका प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. नागरी सेवा-सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका व शासनातर्फे कंत्राटदारांची नेमणूक करण्यात येते.

शासकीय, निमशासकीय संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या विकासकामांना शासकीय व प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर कंत्राटदाराला हे काम दिले जाते. हे काम मिळवण्यासाठी कंत्राटदारांमध्ये मोठी स्पर्धा असते आणि नियमानुसार सर्वांत कमी दराची निविदा (टेंडर)असलेल्या कंत्राटदाराची निवड केली जाते.

पान १ वरून..

**राज्यात मान्सून...**

अंदाज असून येथे 'येलो अलर्ट' लागू करण्यात आला आहे.

विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील स्थिती

कोकणाव्यतिरिक्त राज्याच्या इतर महसुली विभागांमध्येही पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे. विभागवार हवामानाचा अंदाज खालीलप्रमाणे आहे:

विदर्भ: भंडारा, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नागपूर, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

मराठवाडा: छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे. तसेच, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत हलक्या पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

मध्य महाराष्ट्र: धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यांत हलक्या पावसाची हजेरी राहील.

नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

पुढील काही दिवस राज्यातील बहुतांश भागांत मान्सूनची सक्रियता कायम राहणार आहे. त्यामुळे कोकणातील जिल्ह्यांमध्ये पूर आणि विजांच्या धोक्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. विजांच्या कडकडाटासह पाऊस असलेल्या प्रदेशांतील नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे आणि शेतकऱ्यांनी शेतीची कामे करताना योग्य ती सावधगिरी बाळगावी, असे महत्त्वपूर्ण आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**पातळगंगा नदीतून....**

आहे. सिलेंडरच्या टाक्या सापडलेल्या व्यक्तींना पुन्हा तहसीलदार किंवा संबंधित डीलरकडे त्या टाक्या जमा करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील खालापूरमधील एलपीजी बॉटलिंग प्लॉट, चावणे यांचे गोडाऊनमधील सिलेंडर असल्याची माहिती उघडकीस आली आहे. खालापूर येथील प्लॉट नं इ-१/७, अतिरिक्त एमआयडीसी, चावणे भागातील सर्व सिलेंडर पाताळगंगा नदीमध्ये वाहून गेल्याची आजची घटना घडली होती. त्यानंतर, पुरवठा विभागाने याबाबत माहिती घेतली असता परिसरामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे हे सिलेंडर वाहून गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

नाशिकच्या चांदवड-देवळा तालुक्याच्या हद्दीतील दहिवड व चिंचवे गावाच्या सरहदीवरील चोर चावडी धबधब्याजवळ असलेल्या डोहात वर्षा पर्यटनासाठी आलेल्या चांदवड तालुक्यातील वडगाव पंगु येथील एक २१ वर्षीय तरुण बुडाल्याची घटना काल ( दिनांक ७ जुलै ) दुपारच्या सुमारास घडली होती. या घटनेंतर काल दुपारी चार वाजेपासून रात्री आठ वाजेपर्यंत स्थानिक तरुण व मालेगाव येथील पोहणाऱ्यांच्या मदतीने शोधकार्य राबविण्यात आले होते. मात्र, बुडालेल्या तरुणाचा शोध लागला नव्हता. आज सकाळी नऊ वाजेपासून पुन्हा एकदा तरुणाला शोधण्याचे कार्य एन.डी.आर.एफ.च्या जवानांच्या वतीने सुरू करण्यात आले. साधारण सात ते आठ तास सततच्या शोध मोहिमेनंतर धबधब्याजवळ बुडालेल्या तरुणाचा मृतदेह सापडला आहे. ऋषिकेश शशिकांत संसारे ( वय २१ ) असे तरुणाचे नाव असून चांदवड तालुक्यातील वडगाव पंगु येथील तो रहिवासी होता.

**वाहतूक कोंडी ..**

समन्वयाने बस थांबे आणि रिक्षा पॉइंट्स सुरक्षित ठिकाणी हलवले आहेत. मंगळवारपासून या नव्या बदलांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. जिल्हा रुग्णालयाचा रस्ता मोकळा; रुग्णवाहिकांना मार्ग सुकर =वाहतुकीच्या दृष्टीने स्थलांतरित केलेले दोन्ही बस थांबे अत्यंत महत्त्वाचे आहेत. शिवराज पान सेंटर येथील थांबा स्थलांतरित करण्यात आलेला आहे. तेथे थोडा मुरूम टाकणे गरजचे आहे. दोन्ही थांब्यावर एक-एक कंट्रोलर नेमला जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांची सोय होईल. -रणिजित यादव, सुरक्षा व दक्षता अधिकारी, एसटी महामंडळ, बीड जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरच रिक्षा पॉइंट असल्याने तिथे नेहमी वाहतूक कोंडी व्हायची. अनेकदा आपत्कालीन स्थितीत येणाऱ्या रुग्णवाहिकाही या कोंडीत अडकून पडत होत्या. ही गंभीर बाब लक्षात घेऊन वाहतूक पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांनी येथील रिक्षा थांबा थेट बार्शी रोडवरील जिल्हा रुग्णालयाच्या कमानीजवळ हलवला असून तेथील अतिक्रमणही हटवले आहे. वैभव पाटील, पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, बीड.

**विधानभवनात शरद...**

बैठकीत आमदार रोहित पवार यांची अनुपस्थिती लक्षवेधी ठरली. भाजपसोबत जाण्यास रोहित पवार यांचा विरोध असल्यानेच ते आजच्या बैठकीला उपस्थित नव्हते, अशी माहिती समोर आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांची मागील आठवड्यात विधिमंडळात महत्त्वाची बैठक पार पडली. आमदारांकडून पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे माध्यमांमधे सुरू असलेल्या चर्चांबाबत विचारणा करण्यात आली. पक्ष काँग्रेसमध्ये विलिनीकरण करण्यात येणार आहे की एनडीएचा घटकपक्ष होणार, याबाबत आमदारांकडून विचारणा झाली. पक्षातील काही आमदारांकडून काँग्रेससोबत जाणार असाल तर आपल्याला वेगळा विचार करावा लागेल, अशी स्पष्ट भूमिका मांडण्यात आली. तर, आमदार रोहित पवार यांनी भाजपसोबत जाण्याला तीव्र विरोध करताना बैठकीतून बाहेर जाणं

पान १ वरून..

पसंत केलं. त्यानंतर, आजच्या बैठकीला देखील रोहित पवार अनुपस्थित राहिले.

**मुस्लीम आरक्षणाचा....**

मापिला, शेख आणि सय्यद यांचा समावेश होता. मात्र, मद्रास उच्च न्यायालयाने हे असंवैधानिक ठरवले. मद्रास उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती जीआर स्वामीनाथन आणि न्यायमूर्ती पीबी बालाजी यांच्या खंडपीठाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, सरकारी आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायिक निर्णयांच्या पूर्णपणे विरोधात आहेत.

या न्यायालयीन निर्णयांनुसार केवळ इस्लाम धर्म स्वीकारणा-या व्यक्तीलाच फक्त मुसलमान मानले जाऊ शकते. इस्लाम धर्म स्वीकारलेल्यांना आरक्षित प्रवर्गाअंतर्गत मिळणारे आरक्षणाचे लाभ रद्द करण्याचा निर्णय मद्रास उच्च न्यायलयाने दिला होता.

दरम्यान, तामिळनाडू सरकारने मद्रास उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री थलपथी विजय यांच्या सरकारने या प्रकरणी ६ जुलै २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली आहे.

**मुंबईतील प्रसिद्ध रुस्तम ...**

नामांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि ढाब्यांवर अचानक छापेमारी केली. या धडक कारवाईत मुंबईतील नरिमन पॉईंट परिसरातील अत्यंत प्रसिद्ध आणि ऐतिहासिक 'रुस्तम आईस्क्रीम' दुकानाला मोठा दणका देत त्यांचा परवाना तात्काळ निलंबित केला आहे.

या मोहिमेमुळे राज्यातील हॉटेल व्यावसायिक आणि अन्न उत्पादकांचे धाबे दणाणले आहेत. एकाच दिवसात झालेल्या या मोठ्या कारवाईत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत.

नरिमन पॉईंट येथील 'रुस्तम अँड कंपनी' हे मुंबईतील ग्राहकांचे आणि पर्यटकांचे अत्यंत आवडते आणि जुने आईस्क्रीम केंद्र मानले जाते. मात्र, एफडीएच्या पथकाने जेव्हा या ठिकाणी तपासणी केली, तेव्हा तिथली दुरवस्था पाहून अधिकारीही चक्रावले.

# द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात चंपावतीरत्न स्व. विठ्ठलदासजी बियाणी स्मृति पुरस्काराने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



बीड ।प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्र नगर, बीड येथे चंपावतीरत्न स्व. विठ्ठलदासजी बियाणी स्मृतीप्रीत्यर्थ सन २०२५- २६ गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन बुधवार दि.०८ जुलै २०२६ रोजी करण्यात आले.

मागील अठरा वर्षापासुन स्व. विठ्ठलदासजी बियाणी यांच्या स्मरणार्थ दहावी, बारावीतील विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या सर्व शाखेतील गुणवंताना गौरविण्यात येते बुधवारी शाळेच्या प्रांगणात विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांना शाल, पुष्प , विशेष स्मृति चिन्ह, रोख बक्षिसे मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले तसेच विद्यालयातील इ. १० वी. तील कु.आस्था गिरीषजी सोहनी (वाणिज्य शाखा) ९९.८०% , चि. बेग तलहा

रियाज (कला शाखा) ९०.४०% तर इयत्ता १२ वी कला शाखेतील कु. अस्मिता विनोद मुंडे ६२.०० % व वाणिज्य शाखेतुन सर्वप्रथम आलेल्या कु.सिध्दी भारती संगा ९५.३३% गुण प्राप्त या विद्यार्थ्यांना शिल्ड देवून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरूवात दिपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष विष्णुदास तापड़िया, सहमंत्री किशोर बाहेती, मुख्य प्रायोजक विष्णुदास बियाणी, उज्वल कोटेचा, अनिल सुराणा, प्राचार्य सुनील लाहोटी, माजी प्राचार्य रामलाल छाजेड़, मुख्याध्यापक गिरिश सोहनी आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रायोजक विष्णुदास बियाणी यानी मनोगत व्यक्त करताना राजस्थानी विद्यालय ही ज्ञानाची जननी असून अनेक गुरुजनांनी आपल्या ज्ञानदानाने लौकिक वाढवला. या शाळेचे विद्यार्थी भारत देशासह विदेशातही आपली सेवा देत असून संस्थेची अद्यावत इमारत अनेकांना नव्याने ऊर्जा निर्माण करते. मानसाची श्रीमंती धनात नसुन ती ज्ञानात आहे. त्यामुळे ज्ञान मंदिरे सदैव प्रेरणादायी असून संस्कार, संस्कृती आणि मानवी जीवनमूल्यांची निर्मिती येथे होते म्हणून ज्ञान मंदिर सदैव श्रेष्ठ आहेत असे ते यावेळी म्हणाले.

विष्णुदास बियानी यानी याप्रसंगी बोलताना म्हणाले की विद्यार्थ्यांनी परिक्षेला न घाबरता जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश हे मिळतेच हा विश्वास ठेवून कार्यरत रहावे, या विद्यालयाने अनेक डॉक्टर्स, चार्टर्ड अकाउंटेंट, इंजिनियर, कॉम्पुटरतज्ञ घडवले असून विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी योगा, प्राणायाम, भ्रामरी यांचा नित्याभ्यास करावा. आपल्या उज्वल भविष्यासाठी, कुटुंबासाठी, शाळेचे नाव दैदीप्यमान करण्यासाठी अधिकाधिक ज्ञान प्राप्त करून यश संपादन करण्यासाठी प्रयत्नशील रहावे असे आवाहन त्यांनी केले.

या सोहळ्याचे प्रास्ताविक प्राचार्य सुनील लाहोटी सर यांनी तर यावेळी उज्वल कोटेचा, किशोर बाहेती यानी विद्यार्थीना बहुमुल्य मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे अध्यक्ष विष्णुदासजी तापड़िया यानी केले,त्यानी विद्यार्थ्याना मार्गदर्शन करताना भविष्यातील दिशा व संस्थेचा त्याना घडविण्यासाठी केलेले योगदान विशद करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन औटी मॅडम, मालपाणी सर यांनी केले.आभार प्रदर्शनानंतर पसायदानाने कार्यक्रमाचे समापन झाले.यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५३३ दि.१०.०६.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **भिकाजी सखाराम पाळीक, रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नात**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आरती अर्जुन पाळीक | नात | ०४.०९.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५३० दि.१०.०६.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **छाया पि.भिकाजी पाळीक रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | छाया पि.भिकाजी पाळीक | नात | १२.०१.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५३४ दि.१०.०६.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **भिकाजी सखाराम पाळीक रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आर्यन अर्जुन पाळीक | नातु | २९.०६.२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-८३१ दि.०८.०७.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **योगीराज अनिल जाधव, रा.गोविंदपुर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनिल लिंबाजी जाधव | वडील | ०६.०६.२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४६०/२०२६**
**मिठुलाल पि. रामनाथ पालवे व इतर वि. निरंक**
**मार्फत - ॲड एस एस काळे गेवराई**

अर्जदार
१. मिठ्ठलाल पि. रामनाथ पालवे
वय ४९ वर्षे, धंदा - शेती रा. सावरगाव पोखरी ता. गेवराई जि. बीड
२. मंदा भ्र. आत्माराम बटुळे
वय ४० वर्षे, धंदा - घरकाम रा. भारजवाडी ता. पाथर्डी जि. अहमदनगर.

ज्याअर्थी मयत मुक्ताबाई भ्र. रामनाथ पालवे रा. सावरगाव पोखरी ता. गेवराई जि. बीड हे/हया अनुक्रमे दिनांक ०२/०३/२०१९ रोजी रा. सावरगाव पोखरी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मुक्ताबाई भ्र. रामनाथ पालवे रा. सावरगाव पोखरी ता. गेवराई जि. बीड याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः- १७/०८/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई**
**जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४५८/२०२६**
**गजराबाई भ्र. अर्जुन सदाफुले व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. आर.एल. मस्के, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे अर्जुन पि. नामदेव सदाफुले, रा. संगमजळगाव ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक ३०/०८/२००६ रोजी राजवाडी हॉस्पीटल मुंबई ता. जि. मुंबई येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ गजराबाई भ्र. अर्जुन सदाफुले, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. संगमजळगाव ता. गेवराई जि.बीड ह.मु. मुंबई ता. जि. मुंबई, अर्जदार क्र. २ संजय पि. अर्जुन सदाफुले, वय ४२ वर्षे, धंदा शेती व नोकरी, रा. संगमजळगाव ता. गेवराई जि.बीड ह.मु. मुंबई ता. जि. मुंबई, अर्जदार क्र. ३ सतिष अर्जुन सदाफुले, वय ३४ वर्षे, धंदा शेती व नोकरी, रा. संगमजळगाव ता. गेवराई जि.बीड ह.मु. मुंबई ता. जि. मुंबई यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत अर्जुन नामदेव सदाफुले यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १८/०८/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ४४४/२०२६**
**महादेव विर- निरंक**
**(मार्फत ॲड. पी. पी. जरांगे )**

ज्याअर्थी मयत नामे बाबासाहेब पि. तात्याबा विर हे दि. १७.१०.२०२४ हे रोजी मौजे उमापूर, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार
१. महादेव पि. बाबासाहेब विर
वय ४७ वर्षे धंदा - शेती रा. उमापूर ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बाबासाहेब पि. तात्याबा विर हे दि. १७.१०.२०२४ रोजी येथे मयत झाले असून ते मौजे रा. उमापूर ता. गेवराई जि. बीड येथील रहिवासी असून यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीख : १३.०८.२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहीरनामा**
**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**श्रीमती एम.एस.कुलकर्णी दिवाणी न्यायाधिश क.स्तर, केज, यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक २६३/२०२६**
**नि.क.८/ड**
**दीपक विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा मयत १. अंबादास दगड्डु पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड हे दिनांक २९ माहे ०८ सन २०२२ रोजी व २. भागाबाई अंबादास पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड हे दिनांक २५ माहे ०४ सन २०२४ रोजी दोघे मौजे महात्मा ज्योतिबा फुलेनगर, भिवंडी, ठाणे येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी हया कोर्टास सदरहु १. अंबादास दगड्डु पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड २. भागाबाई अंबादास पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ एस.एस. देशपांडे यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार : ०१. दीपक अंबादास पटेकर उर्फ पाटेकर वय- ४१ वर्षे, धंदा-मजुरी रा. कुंबेफळ ता. केज जि. बीड हा.मु. महात्मा ज्योतिबा फुलेनगर, नं. ०१ मान-सरोवर रोड, भिवंडी, ता. भिवंडी जि ठाणे

०२. बाबासाहेब अंबादास पटेकर उर्फ पाटेकर वय- ५९ वर्षे, धंदा-मजुरी रा. कुंबेफळ ता. केज जि. बीड हा.मु. महात्मा ज्योतिबा फुलेनगर, नं. ०१ मान-सरोवर रोड, भिवंडी, ता. भिवंडी जि ठाणे

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु १. अंबादास दगडु पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड २. भागाबाई अंबादास पटेकर उर्फ पाटेकर रा. कुंबेफळ ता. केज. जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात देईल.

आज दिनांक ८ माहे ०७ जुन २०२६
पु.ता. ३१/०८/२०२६

स्वाक्षरित/-
व.लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**स.अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर, केज

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

## कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर लाभासाठी 'अॅग्रीस्टॅक' नोंदणी बंधनकारक

बीड ।प्रतिनिधी

राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना आता आधार कार्ड आणि अॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या क्रमांकाशिवाय कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळणार नाही. तरी बीड जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी ही नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज, जे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत होते आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नाही, अशा शेतकऱ्यांना लाभ मिळेल. जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता, एका किंवा अनेक बँकांमधील मिळून जास्तीत जास्त २ लाख रुपयांपर्यंतची मुद्दल व व्याजासह थकबाकी थेट कर्ज खात्यात जमा करून शेतकरी कर्जमुक्त केले जातील. तसेच ज्या नियमित कर्जदार शेतकऱ्यांनी २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची उचल करून वेळेत परतफेड केली आहे, त्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे.

अॅग्रीस्टॅक नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी प्रथम आपला आधार कार्ड क्रमांक मोबाईल नंबरशी लिंक करणे आवश्यक आहे. आधार लिंक झाल्यानंतर अॅग्रीस्टॅक पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीनंतर मिळणारा अॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आपल्या पीक कर्ज खाते असलेल्या बँकेत जमा करावा. ज्या शेतकऱ्यांकडे आधीपासूनच हा नोंदणी क्रमांक उपलब्ध आहे, परंतु त्यांनी तो अद्याप बँकेत जमा केलेला नाही, त्यांनीही तो त्वरित बँकेकडे सुपूर्द करावा. या क्रमांकाशिवाय कोणत्याही परिस्थितीत योजनेचा लाभ खात्यात जमा होणार नसल्याने शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. असेही जिल्हा उपनिबंधक, बीड यांनी कळविले आहे.

### परळी पत्रकार गृहनिर्माण संस्थेला ५ कोटींचा निधी द्यावा

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे बालाजी जगतकर यांचे निवेदन



बीड ।प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील पत्रकारांना हक्काचे घर मिळावे, या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या पत्रकार गृहनिर्माण संस्थांसाठी राज्य शासनाने ५ कोटींचा विशेष निधी मंजूर करावा, अशी मागणी लघु व मध्यम वृत्तपत्र संघटनेचे जिल्हा सचिव बालाजी श्रावण जगतकर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. श्रीमती सुमित्राताई अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याप्रसंगी शिष्टमंडळात परळी शहराचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, संपादक तथा भारतीय लघु व मध्यम पत्रकार संघटणा जिल्हा सचिव बालाजी जगतकर , कामगार नेते गौतम आगळे आदीचे शिष्टमंडळ भेटले.निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून समाज, शासन आणि जनतेमधील महत्त्वाचा दुवा आहेत. दिवस-रात्र जनहितासाठी कार्य करणाऱ्या अनेक पत्रकारांना आजही स्वतःचे हक्काचे घर उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे परळी वैजनाथ आणि बीड येथे पत्रकारांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण संस्था सक्षमपणे उभारण्यासाठी शासनाने विशेष निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.या पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ पत्रकार गृहनिर्माण संस्था आणि बीड पत्रकार गृहनिर्माण संस्था यांना प्रत्येकी ५ कोटींचा विशेष निधी मंजूर करून पत्रकारांच्या दीर्घकालीन आणि न्याय्य मागणीला न्याय द्यावा, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.पत्रकार कल्याणाला प्राधान्य देत या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकर निर्णय घ्यावा,

# गेवराई मतदारसंघासह बीड जिल्ह्यात एसआयआर मोहिमेला गती द्या

### घराघरात जाऊन प्रत्येक पात्र मतदाराची नोंदणी सुनिश्चित करा - शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अॅड. चंद्रकांत आप्पा नवले



बीड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सघन मतदार नोंदणी (एसआयआर) मोहिमेअंतर्गत गेवराई मतदारसंघासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील शिवसेनेच्या सर्व बीएलए-२ यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक गाव, वाडी-वस्ती आणि शहरातील नागरिकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून मतदार नोंदणी प्रक्रिया प्रभावीपणे राबवावी, असे आवाहन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अॅड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी केले आहे.

मतदार यादीत कोणताही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी बीएलए-२ यांनी नागरिकांच्या घरी भेटी देऊन नवीन मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती, पत्ता बदल, नाव समाविष्ट करणे तसेच आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करून अर्ज भरण्यास मदत करावी. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि दुर्गम भागातील मतदारांना प्राधान्याने सहकार्य करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

विशेषतः गेवराई मतदारसंघात एसआयआर मोहिमेला अधिक गती देण्यासाठी प्रत्येक बूथवर नियोजनबद्ध पद्धतीने काम करणे आवश्यक असल्याचे अॅड. नवले यांनी सांगितले. कोणताही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी बूथनिहाय घरभेटी घेऊन नागरिकांना आवश्यक सहकार्य करावे, असेही त्यांनी नमूद केले.

अॅड. नवले म्हणाले की, मतदार यादी अचूक व अद्ययावत ठेवणे ही लोकशाही बळकट करण्याची अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे शिवसेनेच्या प्रत्येक बीएलए-२ यांनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून मतदार नोंदणीचे काम जबाबदारीने पूर्ण करावे. कोणताही पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रत्येक बीएलए-२ ने जनतेपर्यंत जाऊन सक्रियपणे काम करणे आवश्यक आहे.

एसआयआर मोहिमेत शिवसेनेच्या सर्व बीएलए-२ यांनी संघटनात्मक जबाबदारी समजून जनजागृती करावी, नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात आणि मतदार नोंदणीची प्रक्रिया शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करावे, असे आवाहन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अॅड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी केले. तसेच नागरिकांनीही आवश्यक कागदपत्रांसह वेळेत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले.

# शिराढोणच्या भूमिपुत्राची आणखी एक मानाची भरारी!

### निर्भीड दैनिक समर्थ राजयोगच्या धाराशिव जिल्हा प्रतिनिधीपदी बिलाल भाई कुरेशी यांची नियुक्ती; जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव

धाराशिव (उस्मानाबाद)

जिल्ह्यात पत्रकारितेच्या क्षेत्रात सातत्याने निःपक्ष, धाडसी आणि समाजाभिमुख वृत्तांकन करणारे शिराढोणचे भूमिपुत्र तथा सुप्रसिद्ध पत्रकार बिलाल भाई कुरेशी यांची निर्भीड दैनिक समर्थ राजयोगच्या धाराशिव जिल्हा प्रतिनिधीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे शिराढोण गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

निर्भीड दैनिक समर्थ राजयोगचे संपादक विवेक स्वामी आणि कार्यकारी संपादक आयेशा शेख यांनी बिलाल भाई कुरेशी यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविल्याची घोषणा केली. त्यांच्या नियुक्तीचे वृत्त समोर येताच धाराशिव जिल्ह्यासह विविध सामाजिक,



शैक्षणिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाला आहे.

बिलाल भाई कुरेशी यांनी अनेक वर्षांपासून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या, सामाजिक प्रश्न, विकासकामे आणि जनहिताचे विषय प्रभावीपणे मांडत पत्रकारितेला समाजसेवेचे माध्यम बनविले आहे. सत्य, निःपक्षपातीपणा आणि लोकहित या मूल्यांवर आधारित त्यांच्या कार्यामुळे त्यांनी वाचकांचा विश्वास संपादन केला आहे.

त्यांच्या या नियुक्तीमुळे धाराशिव जिल्ह्यातील बातम्यांना अधिक व्यापक आणि प्रभावी व्यासपीठ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ग्रामीण भागातील प्रश्न शासनापर्यंत पोहोचविणे, लोकांच्या अडचणींना न्याय मिळवून देणे आणि विकासाभिमुख पत्रकारिता अधिक सक्षमपणे पुढे नेणे, अशी अपेक्षा त्यांच्या नियुक्तीकडून व्यक्त होत आहे.

शिराढोण गावासाठीही ही अभिमानाची बाब ठरली असून, कीर्ती महान, मूर्ती लहान या उक्तीप्रमाणे बिलाल भाई कुरेशी यांनी आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करत अनेकांनी ही नियुक्ती त्यांच्या प्रामाणिक परिश्रमांची आणि समाजनिष्ठ पत्रकारितेची योग्य पावती असल्याचे मत व्यक्त केले आहे.

निर्भीड दैनिक समर्थ राजयोगच्या माध्यमातून बिलाल भाई कुरेशी यांच्याकडून लोकहिताची पत्रकारिता अधिक प्रभावीपणे पुढे जाईल, असा विश्वास व्यक्त करत सर्व स्तरांतून त्यांना उज्ज्वल कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### प्रशासकीय कर्तृत्वाला रोटरीचा सलाम

# राज्यपाल परिवाराचे प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांना 'कळंब भूषण' पुरस्कार जाहीर

कळंब (प्रतिनिधी)

समाजसेवा, नेतृत्व आणि गुणवंतांचा सन्मान या रोटरीच्या परंपरेला यंदाही उजाळा मिळणार असून, रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी व इनर व्हील क्लब ऑफ कळंब सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता श्री महावीर भवन, कथले चौक, कळंब येथे पदग्रहण व 'कळंब भूषण' पुरस्कार समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या सोहळ्यात रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीच्या अध्यक्षपदी रो.रवी नरहिरे तर सचिवपदी रो.अभिजीत भिसे पदभार स्वीकारणार आहेत. तसेच इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा सौ.पूर्वा पोरे व सचिव सौ.स्वाती राजमाने यांचाही पदग्रहण सोहळा पार पडणार आहे. कार्यक्रमासाठी प्रा.माया सूर्यकांत मुळे (शिराढोण) या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहणार असून, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट रो.सतीश लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यावर्षीच्या समारंभाचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्र राज्यपाल परिवाराचे प्रबंधक डॉ. निशिकांत श्रीधरराव देशपांडे यांना त्यांच्या चार दशकांहून अधिक कालावधीतील उल्लेखनीय प्रशासकीय, विकासाभिमुख आणि लोकहितवादी कार्याबद्दल 'कळंब भूषण' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

रोटरी क्लबचे विद्यमान अध्यक्ष रो.डॉ.अभिजीत जाधवर, सचिव रो.श्याम जाधवर तसेच इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा प्रा.प्रतिभा भवर व सचिव डॉ.दिपाली लोंढे यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून कळंब शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला जाणार आहे.

महसूलपासून राज्यपाल भवनापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास -



शैक्षणिक गुणवत्तेपासून प्रशासकीय सेवांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे डॉ. निशिकांत देशपांडे यांनी एमपीएससीद्वारे तालुका भूमी अभिलेख निरीक्षक, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी अशी विविध पदे मिळवत प्रशासकीय सेवेत भक्कम स्थान निर्माण केले. त्यांनी उपजिल्हाधिकारी, विशेष भूसंपादन अधिकारी, नांदेड महापालिकेचे आयुक्त, विविध मंत्र्यांचे स्वीय सचिव तसेच सध्या महाराष्ट्र राज्यपाल परिवाराचे प्रबंधक म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. महसूल प्रशासन, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, नगर प्रशासन आणि ई-गव्हर्नन्स या क्षेत्रात त्यांनी राबविलेल्या अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर गौरव मिळाला आहे. अनेक वेळा 'बेस्ट डेप्युटी कलेक्टर', राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार, राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान, स्कॉच ई-गव्हर्नन्स पुरस्कार अशा मानाच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

'कळंब भूषण' सन्मान का विशेष?

कळंब परिसरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीतर्फे 'कळंब भूषण' पुरस्कार प्रदान केला जातो. यंदा हा बहुमान राज्य प्रशासनात उत्कृष्ट कार्याचा ठसा उमटविणारे डॉ. निशिकांत देशपांडे यांना जाहीर झाल्याने कळंबच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. त्यांच्या सन्मानामुळे प्रशासकीय सेवेत कार्यरत तरुण अधिकारी व स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# डोंबिवलीतील डॉक्टरांवरील हल्ल्याचा आयएमए बीडकडून तीव्र निषेध - डॉ अमोल गिते

बीड ।प्रतिनिधी

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर झालेल्या अमानुष हल्ल्याचा इंडियन मेडिकल असोसिएशन बीड शाखेतर्फे तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे.रुग्णसेवा बजावत असताना डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले अत्यंत निषेधार्ह असून अशा घटनांमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात भीतीचे वातावरण निर्माण होते. अशा प्रकारच्या हिंसक घटनांमुळे रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होऊन समाजाचेही मोठे नुकसान होते.

आयएमए बीडने राज्य शासन व पोलीस प्रशासनाकडे संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची, दोषींना तातडीने शिक्षा करण्याची तसेच राज्यातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये



डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

वैद्यकीय व्यावसायिकांवरील कोणत्याही प्रकारची हिंसा कदापि सहन केली जाणार नाही. डॉक्टरांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर पावले उचलावीत, असे आवाहन आयएमए बीडतर्फे करण्यात आले आहे.

# इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या उमेदवारांना आवाहन

बीड ।प्रतिनिधी

राज्यातील इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या सर्वांगीण कल्याणासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत विविध १३ उपकंपन्यांमार्फत बीड जिल्ह्यात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करावेत, असे आवाहन महामंडळाचे बीड जिल्हा व्यवस्थापक बी. एस. भोसले यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ या महामंडळाअंतर्गत मुख्य महामंडळ, कंपनी व १३ उपकंपन्या मार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी २० टक्के बिज भांडवल कर्ज योजना, १ लक्ष थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना अशा एकुण सहा योजना राबविण्यात येत आहेत. यापैकी १ लक्ष थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना या पुर्णपणे ऑनलाईन स्वरुपाच्या असुन इतर मागास प्रवर्गातील पात्र अर्जदारास नाव नोंदणीसाठी महामंडळाच्या्.ीललषवल.ीस या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. उर्वरीत बिजभांडवल योजना हि ऑफलाईन स्वरुपाच्या असून त्याचे अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. याबात अधिक माहितीकरीता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, नगर रोड, बीड दुरध्वनी क्रमांक ०२४४२-२३२६२४ येथे संपर्क साधावा, असेही कळविले आहे.

# एसआयआर कामातून शिक्षकांची सुटका करा; अनिलदादा जगताप यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी!

बीड ।प्रतिनिधी

शिक्षकांवर सोपविण्यात आलेल्या एसआयआर मॅपिंग कामामुळे शैक्षणिक कामकाजावर गंभीर परिणाम होत असून शिक्षकांवरील मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक ताण वाढत आहे. त्यामुळे शिक्षकांना एसआयआरच्या कामातून कायमस्वरूपी मुक्त करून हे काम इतर शासकीय किंवा निमशासकीय यंत्रणेमार्फत राबविण्यात यावे, अशी मागणी शिवसेना आणि शिक्षकसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यात शिक्षकांकडून एसआयआर अंतर्गत मॅपिंगसह विविध अतिरिक्त कामे करून घेतली जात असल्याने विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर विपरीत परिणाम होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शिक्षकांवर मानसिक व शारीरिक ताणही वाढत आहे. तसेच पाटोदा येथील महिला शिक्षिका आणि गेवराई तालुक्यातील शिक्षक योगेश बुंदेले यांच्याशी संबंधित घडलेल्या घटनांचा उल्लेख करत शिक्षकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे. शिवसेनेने निवेदनातून काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये २९ जुलैनंतरचे एसआयआर मॅपिंगचे काम पूर्णपणे बंद करणे, शिक्षकांची एसआयआर कामातून कायमस्वरूपी मुक्तता करणे, एसआयआर मॅपिंगचे काम करणाऱ्या शिक्षकांवर गुन्हे दाखल न करणे तसेच अधिकाऱ्यांकडून गुन्ह्यांची धमकी देऊन मानसिक छळ करू नये, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय महिला शिक्षकांना सायंकाळी ६ नंतर डखठ च्या




कामासाठी पाठवू नये, त्यांच्या सुरक्षिततेची व सन्मानाची हमी द्यावी, एसआयआर मॅपिंग साठी अधिकृत कामकाजाची वेळ निश्चित करावी, बीएलओ म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र बैठक व कामकाजाची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनाही निवेदनात करण्यात आल्या आहेत.

उच्च माध्यमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षकांना बोर्ड परीक्षेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी या कामातून वगळावे, जनगणनेच्या धर्तीवर एसआयआर मॅपिंगचे काम करणाऱ्या शिक्षकांना अर्जित रजा मंजूर करावी, ऑन-ड्युटी बीएलओ म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा किमान १० लाख रुपयांचा विमा उतरवावा, तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित अबाधित राहण्यासाठी एसआयआर मॅपिंगचे काम इतर शासकीय अथवा निमशासकीय यंत्रणेकडे तात्काळ हस्तांतरित करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. वरील सर्व मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक व सकारात्मक विचार करून तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंती शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. याप्रसंगी शिवसेना जिल्हा संघटक सुनिल सुरवसे, उप जिल्हाप्रमुख अजय जाधव, शिक्षकशेना जिल्हाप्रमुख दत्तात्रय कवचट सर, शिक्षकनेते सुनीलजी कुर्लेकर सर, राजेंद्रजी खेडकर सर शिक्षकसेनेचे जिल्हाउपाध्यक्ष गणेश खेडकर सर, गोरक्ष तळेकर, प्रा . निलेश खेडकर सर, आकाश जगताप, प्रतिक कांबळे उपस्थित होते.

# सेल्फी घेताना मित्र खदानीत पडला, मित्राला वाचवताना दोघेही बुडाले; तिघांचा मृत्यू



जळगाव : जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली असून खदानीत सेल्फी काढताना पाय घसरून पडलेल्या तरुणाला वाचवताना आणखी दोघांचा खोल पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. चोपडा (गरश्रसेरप) रस्त्यावरील उड्डाण पुलाच्या बाजूला असलेल्या खोल पाण्यात बुडून तिघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज सायंकाळी पावणेपाच वाजाताच्या सुमारास घडली. या दुर्घटनेनं संपूर्ण शहरावर शोककळा पसरली असून घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मानव बंटी रतनानी (वय १४), कार्तिक विकी उधवानी (वय १४) आणि दिनेश विजय पंजवानी (वय १७) अशी मृतांची नावे आहेत. तिन्ही मुले अमळनेरच्या सिंधी कॉलनीमधील रहिवासी होती. प्राथमिक माहितीनुसार, तिन्ही मुले मंगळवारी सायंकाळी सुमारे ४.४६ वाजता खदाणीत गेली होती. खदाणीत एक बेटासारखा उंचवटा असल्याने तिघे पाण्यातून चालत त्याच्यावर चढले. इकडच्या बाजूला एक फूट पाणी होते. सेल्फी काढतांना एकाचा पाय घसरला त्याला वाचवायला दुसर्याने त्याचा हात धरला मात्र तोही खाली जाऊ लागला म्हणून त्याने तिसऱ्याचा हात धरला मात्र तिघेही ३० फूट खोल पाण्यात बुडाले. ही घटना एका रिक्षावाल्याच्या नजरेस पडली. तो धावत खाली खदाणीजवळ पोहचला तोपर्यंत एकाने ११२ डायल केले.




## महावितरणाच्या हलगर्जीपणाचा बळी

शिरूर कासार : महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या कथित निष्काळजीपणामुळे ३० वर्षीय तरुण शेतकऱ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना ५ जुलै रोजी दुपारी सुमारे ३ वाजता तालुक्यातील हाजीपूर शिवारात घडली. या प्रकरणी मृताच्या वडिलांच्या फिर्यादीवरून महावितरणचे दोन अभियंते व एका लाईनमनविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा चकलांबा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हाजीपूर येथील मच्छिंद्र एकनाथ उगळे (वय ५५) यांनी प्रल्हाद भाऊजी उगळे यांची शेती बटाईने घेतली होती. या शेतातून जाणारी जुनी ३३/११ केव्ही वीजवाहिनी जीर्ण झाली होती. त्यावरील तारा जमिनीच्या अत्यंत जवळ आल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. याबाबत शेतमालक आणि ग्रामस्थांनी महावितरणकडे लेखी अर्ज तसेच दूरध्वनीद्वारे वारंवार तक्रारी करून तारा दुरुस्त करण्याची मागणी केली होती. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच ग्रामस्थांनी स्वतः तारा हटविण्याचा प्रयत्न केल्यास सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे.

## माध्यमिक शाळांमध्ये आता कला-क्रीडा-संगीत शिक्षकांची भरती

### रिक्त पदे अपलोड करायला १० जुलैपर्यंत मुदत

खासगी माध्यमिक शाळांमध्ये आता कला, क्रीडा, संगीत व हस्तकला शिक्षकांची भरती होणार आहे. साधारणत: २५० पटसंख्येसाठी एक कला किंवा क्रीडा शिक्षक, ५०० पटसंख्येसाठी कला व क्रीडा अशी दोन पदे आणि ७५० पटाच्या शाळेत कला, क्रीडा, संगीत किंवा हस्तकला शिक्षक भरता येणार आहे.

१००० पटसंख्येच्या शाळांमध्ये कला, क्रीडा, संगीत, हस्तकला अशी चार पदे भरता येतील, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. क्रीडा शिक्षकांना 'बीएड'चा तर कला, संगीत, हस्तकला




शिक्षकांना 'डीएड'चा स्केल मिळणार आहे.

यंदाच्या शिक्षक भरतीत शालेय शिक्षण विभागाने खूप मोठे बदल केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक भरतीसाठी उमेदवारांना मुलाखतीची अट नसणार आहे. 'टीईटी'चे गुण, व्यावसायिक व शैक्षणिक अर्हतेच्या गुणांवरून त्यांच्या गुणवत्ता यादीनुसार निवडी होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदभरतीसाठी उमेदवारांना १०० शाळांचा प्राधान्यक्रम निवडता येणार असून, ही प्रक्रिया जुलैअखेर सुरू होईल.

दुसरीकडे, खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षक पदासाठी १०० गुणांमधून सर्वाधिक गुण मिळालेल्या उमेदवारांचीच निवड होईल. संबंधित संस्थेला मुलाखतीतून उमेदवारास १० गुण देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. तसेच पवित्र पोर्टलवरील उमेदवारांच्या कागदपत्रांवरून (शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता) व 'टीईटी'त मिळालेल्या एकूण गुणांवरून ९० गुण दिले जाणार आहेत. उमेदवारास 'टीईटी'तून ७५ गुण, व्यावसायिक अर्हतेसाठी ८ व शैक्षणिक अर्हतेनुसार ७ गुण मिळतील. त्यातून सर्वाधिक गुण मिळालेला उमेदवार त्या संस्थेत शिक्षक म्हणून निवडला जाईल. खासगी संस्थांमधील शिक्षक भरतीसाठी इच्छुक उमेदवारांना ५० शाळा तथा संस्थांचा प्राधान्यक्रम भरता येणार आहे.

## रानडुकराच्या हल्ल्यात माजी सैनिक जखमी

किल्ले धारुर (प्रतिनिधी) तालुक्यातील अंजनडोह येथील माजी सैनिक माधव ज्ञानोबा गवरकर हे शेतात जात असताना अचानक रानडुकराने हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर अंबाजोगाई येथील स्वा.रा.ति. ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.



सध्या धारुर वनपरिक्षेत्रात वन्यप्राण्यांची संख्या वाढली असून यात रानडुकरांची संख्या लक्षणीय आहे. वनपरिक्षेत्रात रानडुकराच्या मानवी हल्ल्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. शनिवार दि.४ रोजी धारुर तालुक्यातील अंजनडोह येथील माजी सैनिक शेतकरी आपल्या वाण नदीकाठावर असलेल्या शेतात जात असताना रात्री ९ वाजण्याच्या सुमारास रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला. यात त्यांच्या हातावर गंभीर जखम झाली. धारुर येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण रुग्णालयात पुढील उपचारार्थ दाखल करण्यात आले. घटनेचा पंचनामा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आला आहे.

# होर्मुझ सामुद्रधुनीत पुन्हा हल्ले!

गेल्या २४ तासांत हॉर्मुझ सामुद्रधुनीमध्ये तिसऱ्या व्यापारी तेल जहाजावर हल्ला झाला आहे. अमेरिका आणि इराणमधील युद्ध थांबवण्यासाठी आणि कायमस्वरूपी शांतता कराराच्या वाटाघाटींचा मार्ग मोकळा करण्यासाठी पावले टाकली जात असतानाच ही घटना घडली आहे. त्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत तणाव धुमसतच असल्याचे पुन्हा समोर आले आहे. जगातील सर्वात व्यस्त ऊर्जा कॉरिडोअरपैकी एक महत्वाचा मार्ग असलेल्या या होर्मुझ सामुद्रधुनीच्या सुरक्षेबद्दल पुन्हा एकदा नवीन चिंता निर्माण झाली आहे.



या भागात जहाजांच्या वाहतुकीवर लक्ष ठेवणारी ब्रिटीश नौदल संस्था 'युनायटेड किंगडम मेरीटाईम ट्रेड ऑपरेशन्स'च्या माहितीनुसार, ताज्या घटनेत एका टँकरवर अज्ञात क्षेपणास्त्राने हल्ला करण्यात आला. यामध्ये कोणतीही जीवितहानी किंवा मोठ्या नुकसानीची नोंद झालेली नसली, तरी या हल्ल्यामुळे सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यावसायिक जहाजांना पुन्हा एकदा लक्ष्य केले जात असल्याची भीती वाढली आहे.

मंगळवारी (७ जुलै) आधी झालेल्या दोन वेगवेगळ्या हल्ल्यांनंतर ही घटना घडली आहे. कतारच्या एलएनजी गॅस वाहक जहाजावरील हल्ला आणि सौदीचे ध्वज असलेल्या कच्च्या तेलाच्या टँकरच्या नुकसानीचा समावेश आहे.

# बीएलओ ड्युटीतून मुक्ततेसाठी शिक्षकांचा एल्गार

## ९ जुलैला राज्यभर आंदोलन

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विविध शिक्षक संघटनांनी राज्य सरकारविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे. मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावलोकन एसआयआर मोहिमेअंतर्गत शिक्षकांना बूथ लेव्हल ऑफिसर म्हणून दिल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्यांमधून पूर्णपणे मुक्त करावे, या प्रमुख मागणीसह ९ जुलै रोजी राज्यभर आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आंदोलनामुळे अनेक ठिकाणी शाळांचे कामकाज प्रभावित होण्याची शक्यता आहे.




९ जुलैला शाळा बंद ठेवण्याचा निर्णय

शिक्षक संघटनांनी जाहीर केले आहे की, ९ जुलै रोजी राज्यातील अनेक शाळा बंद ठेवून शिक्षण विभागाच्या तसेच जिल्हास्तरीय प्रशासकीय कार्यालयांसमोर निदर्शने करण्यात येतील. याच दिवशी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यभरातील शिक्षक मोठ्या संख्येने एकत्र येऊन धरणे आंदोलन करणार आहेत.

टीईटी नियमांवरही आक्षेप

संघटनांनी २०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षेतून सूट देण्याची मागणी केली आहे. अनेक वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असलेल्या शिक्षकांना पुन्हा पात्रता परीक्षा देण्याची सक्ती योग्य नसल्याचे त्यांचे मत आहे. तसेच सध्याची टीईटी रचना अधिक व्यवहार्य करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

### पदोन्नती धोरणावर नाराजी

राज्य सरकारच्या नव्या पदोन्नती धोरणावरही शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली आहे. सध्याच्या व्यवस्थेत अनुभव आणि ज्येष्ठतेचा पुरेसा विचार होत नसल्यामुळे दीर्घकाळ सेवा करणाऱ्या शिक्षकांवर अन्याय होत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

## एसआयआर प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवा : अँड श्रीनिवास बेदरे

गेवराई ( प्रतिनिधी) : राज्यात सध्या विशेष मतदार पुनरीक्षण अभियान सुरू बीड जिल्हयातील नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन अँड श्रीनिवास बेदरे यांनी केले आहे केले. पुढे बोलताना अँड श्रीनिवास बेदरे म्हणले, राज्यात सध्या विशेष मतदार पुनरीक्षण अभियान सुरू असून बीएलओ घराघरात जाऊन सुमारे २ कोटी ६४ लाख मतदारांची पडताळणी करत आहेत. नागरिकांनी क्यूआर कोड असलेला डखठ एनुमरेशन फॉर्म काळजीपूर्वक भरावा, त्यावर स्वाक्षरी करावी आणि फॉर्म जमा केल्यानंतर त्याची पोच अवश्य घ्यावी. आपला



मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक मतदाराने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

# गेवराई पोलीसांची जुगार अड्यावर कारवाई

गेवराई(प्रतिनिधी):- मा.पोलीस अधीक्षक श्री. नवनती काँवत, यांच्या अवैध धंद्यावर कडक कारवाई करण्याच्या आदेशानुसार गेवराई पोलीसांनी पथक तयार करून दिनांक ०६.०७.२०२६ रोजी सायंकाळी १८:०० वा. चे सुमारास अंतरवली जाणाऱ्या पांदन रस्त्यालगत देवपिंप्री शिवारतील गायराण जमीनीतील गोठ्यामध्ये तीर्रट नावाचा जुगारावर अचानक छापा मारला असता सदर ठिकाणी ०६ इसम जुगार खेळत असताना मिळून आले. त्यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडून रोख रक्कम व मोटार सायकल असे एकूण ४,२५,०००/-रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सरकार तर्फे फिर्यादीवरून पोलीस ठाणे गवेराई येथे गुरनं.४११/२०२२६, कलम-१२(अ) म.जु. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास पोह/२०२६ राठोड हे करत आहेत.

सदर कारवाई मा. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा. समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड व श्री. अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, पोउपनि अप्पासाहेब रोकडे, पोह/२०२६ सुंदर राठोड, पोह/१३१७ रविंद्र राऊत, पोकॉ / २१७७ धनंजय सुळ, पोकॉ / ८१९ रामराजे यांनी सदर कारवाईत यांनी सहभाग घेतला.



## मतदारांनी एस.आय.आर. फॉर्म भरुन लोकशाही अधिक सक्षम करावी - शेख फारुख

बीड, प्रतिनिधी : सध्या निवडणूक आयोगामार्फत सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत सर्व पात्र मतदारांनी वेळेत आपला फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शेख फारुख यांनी केले आहे.

शेख फारुख म्हणाले की, मतदार यादी अद्ययावत व अचूक ठेवण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत कायम राहावे आणि भविष्यात मतदानाचा अधिकार अबाधित राहावा यासाठी नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

यावेळी शेख फारुख यांनी नागरिकांना आपल्या परिसरातील बीएलओ (ईींह डर्शींशश्र जषषळलशी) यांच्याशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह एस.आय.आर. फॉर्म तातडीने भरावा, असे आवाहन केले. तसेच समाजातील सर्व घटकांनी आपल्या कुटुंबीय, नातेवाईक व शेजाऱ्यांनाही या प्रक्रियेची माहिती देऊन जनजागृती करावी, असेही त्यांनी नमूद केले.

लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराचा सहभाग महत्त्वाचा असून, कोणताही पात्र मतदार



या प्रक्रियेपासून वंचित राहू नये, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शेख फारुख यांनी केले.

## मा. माजी मंत्री आ. बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त 'सुपर फास्ट हस्ताक्षर' स्पर्धेच्या विजेत्यांचा गौरव

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

मा. माजी मंत्री आ. बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त प्रहार संघटना, किल्ले धारूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'सुपर फास्ट हस्ताक्षर' स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा आज जनता माध्यमिक विद्यालय, किल्ले धारूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते सुरेश आण्णा गवळी तसेच भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष सादेक भैय्या इनामदार उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डेपो मॅनेजर शशिकांत मुळे , प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार गोवर्धन बडे,पत्रकार बाबुराव



तिडके,हे उपस्थित होते.

यावेळी प्रहार संघटनेचे जिल्हा सरचिटणीस तथा ता.अध्यक्ष हनुमंत तोंडे, विष्णू चोले, मनोज तिडके, मधुकर चोले, चंद्रकांत चव्हाण, भगवान तट्ट, ज्ञानदीप शिनगारे,परमेश्वर हंडिबाग महिला प्रहार तालुकाध्यक्ष सुमित्रा धस, स्मिता चव्हाण यांच्यासह प्रहार संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या कार्यक्रमास जनता माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# बाळासाहेब कडबाने यांच्यावरील अन्यायकारक गुन्हा मागे घ्या जालना जिल्हा पत्रकार कृती समिती आक्रमक

## अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्फत पोलीस महानिरीक्षक यांना निवेदन गुन्हा मागे घ्या

जालना शेख फारुक :-

पत्रकारितेचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या आणि सत्य लिहिणाऱ्या पत्रकारांचा आवाज दाबणाऱ्या प्रवृत्तींविरोधात जालना जिल्ह्यातील संपूर्ण पत्रकार वर्ग आता रस्त्यावर उतरला आहे. दैनिक जगमित्र या प्रादेशिक वृत्तपत्राचे मुख्य संपादक बाळासाहेब कडबाने यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील बेगमपुरा पोलीस ठाण्यात राजकीय आकसबुद्धीने दाखल करण्यात आलेला गुन्हा अत्यंत चुकीचा बेकायदेशीर आणि अन्यायकारक आहे. हा खोटा गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा या मागणीसाठी जालना जिल्हा पत्रकार कृती समिती आणि जिल्ह्यातील समस्त संपादक-पत्रकारांच्या वतीने जालना जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांना एक धडाकेबाज निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनाद्वारे पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांच्याकडे तातडीने योग्य ती कारवाई करण्याची आग्रही मागणी करण्यात आली असून पत्रकारांनी प्रशासकीय दडपशाहीचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.

वक्फ बोर्डाच्या कारभाराचे वाभाडे काढल्यामुळेच आकसबुद्धीने कारवाई

काही दिवसांपूर्वी दैनिक जगमित्र मध्ये राज्य वक्फ बोर्डाच्या कारभाराविषयी एक अत्यंत सडेतोड निर्भीड आणि पुराव्यांवर आधारित वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. सदर वृत्त केवळ जनहितासाठी आणि वक्फ बोर्डाचा पारदर्शक कारभार समोर आणण्यासाठीच प्रसिद्ध केले गेले होते. यात कोणाचीही वैयक्तिक बदनामी करण्याचा किंवा धार्मिक भावना दुखावण्याचा कोणताही हेतू नव्हता.परंतु वक्फ बोर्डाच्या भ्रष्ट कारभाराचे वाभाडे निघाल्याने संबंधितांना सत्य पचवणे कठीण झाले. या प्रसिद्ध झालेल्या सत्य वृत्ताचा जाणीवपूर्वक विपर्यास करून,



अत्यंत आकसबुद्धीने वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या सहाय्यकामार्फत संपादक बाळासाहेब कडबाने यांच्यावर बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई थेट अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आणि लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर उघड गदा आणणारी आहे.

तर मग पत्रकारांनी पत्रकारिता कशी करावी? पत्रकारांचा संतप्त सवाल

गेल्या अनेक वर्षांपासून बाळासाहेब कडबाने हे पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक व प्रशासकीय प्रश्न अत्यंत प्रामाणिकपणे आणि निर्भीडपणे मांडत आहेत. समाजातील वस्तुस्थिती प्रशासनासमोर आणणे हाच त्यांच्या पत्रकारितेचा मुख्य उद्देश राहिला आहे. सत्य आणि पारदर्शक पत्रकारिता करत असताना अशा प्रकारे थेट फौजदारी गुन्हा दाखल झाल्यामुळे जालना जिल्ह्यातील संपूर्ण पत्रकार वर्गामध्ये तीव्र चिंतेचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. लोकशाहीत जर पत्रकारांनी सत्य मांडले आणि त्यावरच गुन्हे दाखल होऊ लागले तर पत्रकारांनी पत्रकारिता कशी करावी? असा संतप्त आणि रोखठोक सवाल पत्रकार बांधवांनी प्रशासनाला विचारला आहे.

वरिष्ठ पातळीवर निष्पक्ष चौकशी करून गुन्हा मागे घेण्याची मागणी

अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्फत पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर यांना निवेदनाव्दारे मागणी केली की प्रशासनाने स्वतः तातडीने लक्ष घालावे. वरिष्ठ पातळीवर योग्य ती पडताळणी व निष्पक्ष चौकशी करून बाळासाहेब कडबाने यांच्यावरील सदर खोटा गुन्हा तात्काळ मागे घ्यावा आणि पत्रकार बांधवांना न्याय द्यावा. या निवेदनाची एक प्रत योग्य त्या कारवाईसाठी जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनाही रवाना करण्यात आली आहे.

# जाफराबाद तालुक्यात वरखेडा विरो येथील रस्त्याची दुरवस्था

## खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने दुचाकीस्वार पडत आहेत, प्रशासनाचे दुर्लक्ष

जाफराबाद प्रतिनिधी

तालुक्यातील वरखेडा येथील मुख्य रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून संपूर्ण रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून, यातून मार्ग काढताना दुचाकीस्वारांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. या धोकादायक परिस्थितीमुळे अपघातांचा धोका वाढला असून स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.दुचाकीवरून नागरिक पडत आहेत, अपघातांचे सत्र सुरू

रस्त्यावरील खड्ड्यांचा आणि त्यात साचलेल्या पाण्याचा अंदाज न आल्यामुळे दररोज अनेक दुचाकीस्वार घसरून खाली पडत आहेत. यामुळे अनेक वाहनधारकांना किरकोळ व गंभीर दुखापत होत आहे. खड्ड्यांमध्ये साचलेल्या घाण पाण्यामुळे पादचाऱ्यांच्या अंगावर चिखल उडत असून, शाळकरी मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता, हेच समजत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया वरखेडा येथील वाहनचालक बाळकृष्ण लोखंडे (स्कूल बस) यांनी दिली . प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नागरिक संतप्तया समस्येबाबत स्थानिक प्रशासनाला आणि लोकप्रतिनिधींना वारंवार सांगूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. तात्पुरती मलमपट्टी न करता या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे. प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष देऊन रस्ता दुरुस्त करावा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा वरखेडा येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

# परळीतील तोहीद खान हत्याप्रकरणी निष्पक्ष एसआयटी ड्खढ चौकशीची मागणी न्यायासाठी

# सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र आक्रमक

## दोषींना कठोर शिक्षा पीडित कुटुंबाला न्याय मिळाल्याशिवाय संघर्ष थांबणार नाही- सलमान आसद पठाण

घनसावंगी प्रतिनिधी :- परळी येथे मयत तोहीद खान यांच्या हत्याप्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळावा दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि संपूर्ण प्रकरणाचा विशेष तपास पथक एसआयपी ड्खढ मार्फत तपास करण्यात यावा या प्रमुख मागण्यांसाठी सकल मुस्लिम युवक महाराष्ट्रच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या नावे घनसावंगी तहसीलदारांमार्फत निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनाचे नेतृत्व सकल मुस्लिम युवक महाराष्ट्रचे घनसावंगी तालुका अध्यक्ष सलमान आसद पठाण यांनी केले. त्यांनी सांगितले की तोहीद खान हत्याप्रकरणात कोणत्याही प्रकारचा पक्षपात न होता सत्य समोर यावे दोषींना कायद्यानुसार कठोर शिक्षा व्हावी आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळावा हीच संघटनेची भूमिका आहे.

निवेदनात प्रत्येक आरोपीला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपची न्यायवैद्यकीय फॉरेन्सिक तपासणी करण्यात यावी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाला असल्यास त्याची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी पीडित कुटुंबाला किमान दहा लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी कुटुंबातील एका पात्र सदस्याला शासकीय नोकरी द्यावी तसेच शासनामार्फत सक्षम विशेष




सरकारी वकिलाची नियुक्ती करावी अशा ठोस मागण्या करण्यात आल्या आहेत.यावेळी बोलताना तालुका अध्यक्ष सलमान आसद पठाण म्हणाले हा लढा कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून न्याय संविधान आणि कायद्याच्या राज्यासाठी आहे. मयत तोहीद खान यांच्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत आमचा लोकशाही मार्गाने सुरू असलेला संघर्ष कायम राहील.निवेदन सादर करताना सकल मुस्लिम युवक महाराष्ट्रचे शहराध्यक्ष नेहाल शेख,ज्येष्ठ नागरिक नाजर शेख,जयद शेख, फजल,सलमान पठाण तसेच ज्येष्ठ पत्रकार सलमान पठाण यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवेदनामुळे परळीतील तोहीद खान हत्याप्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली असून पीडित कुटुंबाला न्याय मिळावा अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# १४ निष्पापांचे बळी शेकडो जखमी तरीही प्रशासनाला जाग येईना

## रस्ता सुरक्षा उपाययोजनांसाठी १२ जुलैला शहापूर येथे रस्ता रोको आंदोलन शांताई प्रतिष्ठान व ग्रामस्थांचा एल्गार

शहागड प्रतिनिधी :-

झिरपी तांडा ते धाकलगाव मार्गावर रक्ताच्या चिळकांड्या उडत आहेत निष्पापांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत.गेल्या अवघ्या सहा महिन्यांत या मृत्यूच्या महामार्गाने १४ जणांचे बळी घेतले तर शेकडो नागरिकांना कायमचे अपंगत्व आले. मात्र सुस्त आणि ढिम्म प्रशासनाला अद्यापही स्पीड ब्रेकर गतिरोधक उभारण्यासाठी मुहूर्त सापडलेला नाही. प्रशासनाच्या या जीवघेण्या उदासीनतेच्या निषेधार्थ आणि तात्काळ रस्ता सुरक्षा उपाययोजनांच्या मागणीसाठी शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान व परिसरातील ग्रामस्थांनी आरपारची लढाई पुकारली आहे. येत्या १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शहापूर येथे तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्याचा थेट इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.यासंदर्भातील सविस्तर निवेदन थेट मुख्यमंत्री सार्वजनिक बांधकाम मंत्री, परिवहन मंत्री पालकमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ईमेलद्वारे पाठवून प्रशासनाचे कान टोचण्यात आले आहेत.वारंवार निवेदने देऊनही झोपलेले प्रशासन

झिरपी तांडा ते धाकलगाव हा मार्ग आता मृत्यूचा सापळा बनला आहे. येथील धोकादायक वळणे आणि अपघातप्रवण क्षेत्राबाबत ग्रामस्थ, ग्रामपंचायत, शैक्षणिक संस्था आणि शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानने आजवर अनेकदा लेखी तक्रारी निवेदने आणि स्मरणपत्रे दिली.धक्कादायक बाब म्हणजे



प्रशासनाने स्वतःच्या कागदपत्रांमध्येही ही ठिकाणे अत्यंत अपघातप्रवण ब्लॅक स्पॉट असल्याचे मान्य केले आहे. तरीही संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. यामुळेच हा मानवनिर्मित नरसंहार घडत असल्याचा संतप्त आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तर ती काळजाचा थरकाप उडवणारी दुर्घटना टळली असती दोन दिवसांपूर्वीच शहापूर येथे दोन एसटी बसची समोरासमोर भीषण धडक झाली. यामध्ये तब्बल ४० शालेय विद्यार्थिनींसह अनेक प्रवासी रक्ताच्या थारोळ्यात पडले आणि गंभीर जखमी झाले. जर वेळोवेळी केलेल्या मागण्यांची दखल घेऊन येथे गतिरोधक आणि सुरक्षा फलक लावले असते तर आज या चिमुरड्या विद्यार्थिनींना आणि प्रवाशांना मृत्यूच्या दारात जावे लागले नसते. या दुर्घटनेने संपूर्ण परिसरात तीव्र संताप लाट उसळली आहे.

संबंधित अधिकारी ठेकेदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करा

सार्वजनिक सुरक्षिततेशी खेळणाऱ्या आणि निष्काळजीपणा करणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, संबंधित कर्मचारी आणि संबंधित ठेकेदारावर तातडीने कडक विभागीय आणि फौजदारी कारवाई करण्यात यावी. भविष्यातील अपघात टाळण्यासाठी त्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांना थेट कायदेशीर कचाट्यात ओढावे अशी आक्रमक मागणी शांताई प्रतिष्ठानने केली आहे.

प्रशासनाने १२ जुलैपूर्वी अपघातप्रवण ठिकाणी गतिरोधक आणि आवश्यक रस्ता सुरक्षा उपाययोजना युद्धपातळीवर सुरू कराव्यात. अन्यथा लोकशाही व संविधानिक मार्गाने शहापूर येथे होणाऱ्या रस्ता रोको आंदोलना दरम्यान उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला सर्वस्वी प्रशासन आणि संबंधित ठेकेदारच जबाबदार असतील

शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान व समस्त ग्रामस्थ

# महिला लोककला महोत्सवातून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरांचा रंगोत्सव

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने 'महिला लोककला महोत्सव' या विशेष सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन दि. ११ ते १३ जुलै २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ६.०० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा, लोकसंस्कृती आणि महिला लोककलावंतांच्या कलाविष्काराला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्राची लोकसंस्कृती ही विविध लोककला, लोकपरंपरा, लोकसंगीत आणि लोकनृत्यांनी समृद्ध आहे. या परंपरांच्या जतन, संवर्धन आणि प्रसारामध्ये महिला कलाकारांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे. पारंपरिक लोककलांमधून सामाजिक मूल्ये, सांस्कृतिक वारसा आणि लोकजीवनाचे दर्शन घडविणाऱ्या या कलावंतांचा गौरव करण्यासाठी तसेच नव्या पिढीसमोर लोकसंस्कृतीचे वैभव प्रभावीपणे सादर करण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.




'महिला लोकरंग महोत्सव' हा महाराष्ट्रातील विविध लोककलांचा रंगतदार संगम ठरणार असून त्यामध्ये मंगळागौर नृत्य, लावणी, एकतारी भजन, भारूड, गोंधळ, मुलखावेगळी गाणी तसेच शाहिरी अशा विविध लोककला प्रकारांचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे. परंपरा, संस्कृती आणि लोककलेचे वैविध्य रसिकांना या महोत्सवातून अनुभवता येणार आहे.

या महोत्सवामध्ये राज्यातील विविध भागांतील महिला लोककलावंत आपल्या सशक्त कलाविष्कारातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणार आहेत. लोकनृत्य, लोकसंगीत आणि पारंपरिक कलाप्रकारांच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीचे सौंदर्य, स्त्रीशक्तीचा सहभाग आणि लोकजीवनातील सांस्कृतिक समृद्धी प्रभावीपणे उलगडली जाणार आहे.

लोककला ही समाजप्रबोधन, लोकजागृती आणि सांस्कृतिक एकात्मतेचे प्रभावी माध्यम असून महाराष्ट्राच्या अस्मितेशी तिचे अतूट नाते आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून लोककला परंपरेचे संवर्धन, महिला कलाकारांना प्रोत्साहन आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात येत आहे.

सदर कार्यक्रम मा. ड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे जतन, संवर्धन आणि व्यापक प्रसार करण्याबरोबरच लोककला क्षेत्रातील महिला कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवित आहे.

सदर कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून बीड जिल्ह्यातील कला रसिक, विद्यार्थी, संशोधक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या लोककला महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

# पावली चालली पंढरीची वाट... पार्थनगरी भक्तिरंगात मुक्ताई पालखीवर पुष्पवृष्टी वारकऱ्यांच्या जयघोषाने दुमदुमला पाथरवाला

पाथरवाला प्रतिनिधी :- आषाढी वारीच्या पवित्र पर्वात संतपरंपरेचा अखंड वारसा जपत आदिशक्ती संत मुक्ताबाई साहेब यांच्या पालखी सोहळ्याचे गुरुवार दि.९ जुलै २०२६ रोजी अंबड तालुक्यातील पाथरवाला बु. पार्थनगरी येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात जंगी स्वागत करण्यात आले. ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस या संतवचनांचा प्रत्यय देणारा हा सोहळा गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अविस्मरणीय ठरला.टाळ-मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकाराम माऊली-माऊली आणि पुंडलिक वरदा हरी विठ्ठल या अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.पंढरीच्या वाटेवर निघालेल्या हजारो वारकऱ्यांच्या स्वागतासाठी गावातील नागरिक तरुण मंडळे महिला बचत गट आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने गावाच्या वेशीवर एकत्र आले होते. पालखीवर पुष्पवृष्टी करत औक्षणाने संत मुक्ताईंचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले.या स्वागतासाठी संपूर्ण पाथरवाला गाव भगव्या पताका आकर्षक रांगोळ्या आणि तोरणांनी सजले होते. भक्तिभावाने नटलेल्या वातावरणात पालखीचे आगमन होताच



ग्रामस्थांनी मुक्ताई माऊलींचा विजय असो अशा जयघोषात परिसर दणाणून सोडला.यानंतर मुक्ताई मंदिरात पालखीचे विधिवत पूजन करण्यात आले. महाआरतीनंतर निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव आणि तुकाराम महाराजांच्या नामाचा अखंड गजर सुरू होता. पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.या सोहळयाने सामाजिक एकोप्याचेही दर्शन घडविले. जाती-धर्म पंथ यांचे सर्व भेद विसरून गावातील नागरिकांनी एकत्र येत वारकऱ्यांची सेवा केली. वारी ही समता बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारी परंपरा असल्याचे या प्रसंगी पुन्हा अधोरेखित झाले.

एका दिंडी प्रमुखांनी भावना व्यक्त करत सांगितले मुक्ताईंच्या पालखीसोबत चालणे म्हणजे प्रत्यक्ष पंढरीची वाट चालण्याचा दिव्य अनुभव आहे. पाथरवाला गावाने आमचे जे प्रेमाने आणि भक्तिभावाने स्वागत केले ते आयुष्यभर स्मरणात राहील.

दुपारचा विसावा घेतल्यानंतर मुक्ताईंचा पालखी सोहळा पुढील मुक्कामासाठी मार्गस्थ झाला. निरोप घेताना वारकऱ्यांनी ग्रामस्थांना विठ्ठल-रुक्मिणींच्या आशीर्वादाचा प्रसाद दिला. या ऐतिहासिक आणि भक्तिमय स्वागत सोहळ्यामुळे पाथरवाला बु.गाव संपूर्ण दिवस भक्तिरसात न्हाऊन निघाले.

# महसूल प्रशासनाच्या गंभीर निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यावर अन्याय

## दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर तातडीने शिस्तभंग व फौजदारी कारवाईची छावा क्रांतिवीर सेनेची मागणी




पैठण प्रतिनिधी

छावा क्रांतिवीर सेना, महाराष्ट्र राज्यच्या वतीने पैठण तहसील कार्यालयाकडे मौजे टाकळी अंबड येथील गट क्रमांक २२६/५ संदर्भात सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. या प्रकरणात ऑनलाइन ७/१२ प्रक्रियेदरम्यान झालेल्या चुकीच्या वर्ग-२ नोंदीमुळे संबंधित शेतकऱ्याला अनेक वर्षे आर्थिक, मानसिक व प्रशासकीय त्रास सहन करावा लागल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, कोणताही सक्षम आदेश नसताना महसूल नोंदीत चुकीचा बदल करण्यात आला. ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतरही तत्कालीन मंडळ अधिकाऱ्यांनी वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करता अहवाल सादर करण्यास टाळाटाळ केली. परिणामी, हे प्रकरण जवळपास तीन वर्षे प्रलंबित राहिले आणि संबंधित शेतकरी शासनाच्या विविध योजनांपासून तसेच बँक कर्ज, हस्तांतरण आदी हक्कांपासून वंचित राहिला.

छावा क्रांतिवीर सेनेने या प्रकरणात महसूल प्रशासनातील संबंधित तलाठी, तत्कालीन मंडळ अधिकारी तसेच इतर जबाबदार अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कर्तव्यात कसूर, वरिष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन आणि शासकीय अधिकारांचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम तसेच इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.संघटनेने तहसीलदार यांच्याकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत: चुकीची वर्ग-२ नोंद तातडीने रद्द करून योग्य वर्ग-१ नोंद करण्यात यावी. दोषी तलाठी व तत्कालीन मंडळ अधिकाऱ्यांवर शिस्तभंग व फौजदारी कारवाई करण्यात यावी. संबंधित शेतकऱ्याच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई दोषी अधिकाऱ्यांच्या वेतनातून वसूल करण्यात यावी. तालुक्यातील अशा सर्व संशयास्पद नोंदींची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात यावी. सात दिवसांच्या आत कारवाईचा अहवाल सादर करण्यात यावा.याबाबत छावा क्रांतिवीर सेनेचे प्रदेश सरचिटणीस श्री. अनिल राऊत यांनी सांगितले की, महसूल विभागातील निष्काळजीपणा आणि मनमानीमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर अशा अधिकाऱ्यांना कोणतीही सवलत मिळू नये. दोषींवर कठोर कारवाई झाली नाही तर छावा क्रांतिवीर सेना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडेल आणि हा विषय जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांकडेही मांडला जाईल.

यावेळी उपस्थित प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, मराठवाडा अध्यक्ष रामेश्वर बावणे, सचिव भगवान सोरमारे, कृष्णा काळे, शेतकरी लक्ष्मण ढोले यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# जालना आरटीओ महामार्ग पोलिसांचे डोळे पांढरे झाले का शहागड-अंबड-जालना महामार्गावर ओव्हरलोड यमदूतांची बिनधास्त धाव

## भंगार आणि सळईच्या अवजड गाड्यांची रात्रंदिवस सनाट वाहतूक निष्पापांच्या जिवाशी खेळ सुरू कारवाईच्या नावावर मात्र कमालीची शांतता




जालना शेख फारुक :-

शहागड-अंबड-जालना या महामार्गावर सध्या कायद्याचा पुरता बोजवारा उडाला असून आरटीओ प्रादेशिक परिवहन विभाग आणि महामार्ग पोलिसांच्या नाकाखाली मृत्यूचे तांडव सुरू आहे. भंगार स्क्रॅप आणि लोखंडी सळईने ओव्हरलोड भरलेल्या अजस्त्र गाड्या कोणत्याही भीतीशिवाय रात्रंदिवस सनाट आणि बिनधास्तपणे या महामार्गावरून सुसाट धावत आहेत. सर्वसामान्यांचा जीव मुठीत धरून ठेवणाऱ्या या वाहतुकीकडे संबंधित विभाग ढिम्म राहून केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने या खाबूगिरी मागे नेमकं अर्थ'कारण काय? असा संतप्त सवाल आता जनता विचारत आहे.महामार्ग की मृत्यूचा सापळा या महामार्गावरून धावणाऱ्या भंगार आणि सळईच्या गाड्यांची अवस्था पाहिली तर काळजाचा थरकाप उडतो. क्षमतेपेक्षा दुप्पट-तिप्पट वजन भरून गाड्यांच्या बॉडीच्या बाहेर कित्येक फूट लोखंडी सळई आणि टोकदार भंगार काढलेले असते. रात्रीच्या वेळी तर या गाड्यांना कोणतेही रिफ्लेक्टर नसतात ना कुठली धोक्याची सूचना एखादा दुचाकीस्वार किंवा लहान वाहन या गाड्यांच्या जवळून जाताना थोडा जरी अंदाज चुकली तर थेट मृत्यूच्या दाढेतच जाणार अशी भीषण परिस्थिती आहे. असे असतानाही या ओव्हरलोड यमदूतांना रोखणारे कोणीच कसे नाही? तर मग आरटीओ आणि पोलिसांचे ते पथक करतेय काय?

महामार्गावर सुरक्षेचा आव आणणारे आरटीओचे वायुवेग पथक आणि हायवे पोलीस नेमके कुठल्या कोपऱ्यात ढाराढूर झोपले आहेत? की त्यांचे हात ओले झाल्यामुळे त्यांना या ओव्हरलोड गाड्या दिसतच नाहीत रात्रंदिवस भरधाव वेगाने धावतात या गाड्या वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून या गाड्या कोणाच्या आशीर्वादाने धावत आहेत? हे पांढरपेशी अधिकारी आता एखाद्या मोठ्या अपघाताची आणि निष्पाप नागरिकांच्या बळींची वाट पाहत आहेत का? असा रोकडा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

वाहतूकदारांची दादागिरी प्रशासनाचे लोटांगण

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या ओव्हरलोड वाहतूकदारांचे आणि काही भ्रष्ट अधिकाऱ्यांचे लागेबंधे इतके घट्ट आहेत की कारवाईचे नुसते नाटक केले जाते. प्रत्यक्षात मात्र वसुलीचा महिना वेळेवर पोहोचत असल्याने महामार्गावर या गाड्यांना ग्रीन कॉरिडॉर मिळाल्यासारखी परिस्थिती आहे. ओव्हरलोड सळई मागून येणाऱ्या वाहनांच्या थेट काचा फोडून आत घुसते तरीही आरटीओचे डोळे उघडायला तयार नाहीत.

शहागड-अंबड-जालना महामार्गावरील हा जीवघेणा खेळ आता तात्काळ थांबला पाहिजे. मुख्यमंत्र्यांपासून ते परिवहन मंत्र्यांपर्यंत रस्ते सुरक्षेच्या गप्पा मारल्या जातात, मग जालना जिल्ह्यात कायद्याची ही ऐशीतैशी का? आरटीओ आणि महामार्ग पोलिसांनी तात्काळ या ओव्हरलोड गाड्यांवर धडक कारवाई करून गुन्हे दाखल करावेत अन्यथा जनतेचा भडका उडेल आणि तीव्र आंदोलनाला तोंड फुटेल असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे. आता तरी संबंधित विभागाचे कुंभकर्णी डोळे उघडणार की आणखी कोणाचा बळी जाण्याची वाट बघणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारात शिक्षकांच्या सहाय्यक बीएलओ नियुक्त्या तात्काळ रद्द करा

भोकरदनमध्ये पालकांचा थेट तहसीलदारांना इशारा अन्यथा तीव्र आंदोलनाचा पवित्रा

भोकरदन इसरारखान पठाण :-

एकीकडे शासन गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या मोठमोठ्या गप्पा मारत असताना दुसरीकडे मात्र शिक्षकांना अशैक्षणिक कामांच्या खाईत ढकलून विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय केले जात आहे. भोकरदन येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना देण्यात आलेल्या सहाय्यक बीएलओ च्या नव्या नियुक्त्या तात्काळ रद्द करण्यात याव्यात या मागणीसाठी आज पालकांच्या एका शिष्टमंडळाने थेट तहसीलदार निलेश पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करा अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडू असा आक्रमक इशारा पालकांनी प्रशासनाला दिला आहे.

१२ तुकड्या आणि फक्त ५ शिक्षक कसा होणार अभ्यास

भोकरदन येथील जिल्हा परिषद शाळेत उर्दू आणि मराठी माध्यमाचे वर्ग स्वतंत्र दोन इमारतींमध्ये चालविले जातात. शाळेत इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून एकूण १२ तुकड्या आहेत. सध्या शाळेत केवळ १० शिक्षक कार्यरत आहेत.

या भयानक वास्तव्याकडे पालकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे:आधीच २ शिक्षक पूर्णवेळ बीएलओ शाळेतील २ शिक्षक आधीच बीएलओ म्हणून पूर्णवेळ काम पाहत आहेत.

उर्वरित ८ शिक्षकांवर अतिरिक्त ताण उर्वरित ८ शिक्षकांनी नुकतेच जनगणनेचे कामही पार पाडले आहे.नव्याने आणखी ३ शिक्षकांची बळी आता प्रशासनाने पुन्हा नवीन आदेश काढून आणखी ३ शिक्षकांची 'सहाय्यक बीएलओ' म्हणून नियुक्ती केली आहे.



जर हे ३ शिक्षकही निवडणूक कामाला गेले तर शाळेत १२ तुकड्या सांभाळण्यासाठी फक्त ५ शिक्षक शिल्लक राहतील. माध्यमिक शाळा असल्याने प्रत्येक विषयाला स्वतंत्र शिक्षक आवश्यक असतो. एका विषयाचा शिक्षक दुसऱ्या विषयाचे प्रभावी अध्यापन करू शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे न भरून निघणारे शैक्षणिक नुकसान होणार आहे.

मुलींच्या सुरक्षेचा आणि शिस्तीचा प्रश्न ऐरणीवर!

शाळेत विद्यार्थिनींची संख्या लक्षणीय आहे. १२ तुकड्यांवर केवळ ५ शिक्षक राहिल्यास वर्गात शिस्त राखणे विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवणे आणि मुख्यत्वे मुलींच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणे अत्यंत कठीण होणार आहे. शिक्षकांअभावी शाळेत कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल पालकांनी उपस्थित केला आहे.

'शाळा वाचवा निवडणूक कामांसाठी पर्यायी यंत्रणा वापरा

शिक्षण हा विद्यार्थ्यांचा मूलभूत हक्क आहे. शैक्षणिक सत्र सुरू असताना शिक्षकांना अशा प्रकारे अशैक्षणिक कामात गुंतवणे अत्यंत दुर्दैवी आहे. प्रशासनाने निवडणूक कामांसाठी शिक्षकांऐवीजी इतर शासकीय यंत्रणेचा वापर करावा आणि शाळा वाचवाव्यात अशी मागणी पालकांनी केली आहे.

तहसीलदार निलेश पाटील यांनी पालकांचे निवेदन स्वीकारले असून या गंभीर समस्येबाबत वरिष्ठांकडे तात्काळ पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.

पालकांचे शिष्टमंडळ आक्रमक

निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते प्रदिप जोगदंडे, शेख नसीम, अकिल काश्मी, जावेद पठाण, शेख हमिद, शेख शकील, शेख असद, शेख जुबेर आदींसह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या हक्काच्या शिक्षणासाठी शेवटच्या क्षणापर्यंत आणि शेवटच्या शिक्षकासाठी आमचा हा लढा सुरूच राहील. प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास पालक आणि नागरिक रस्त्यावर उतरून प्रशासनाला जाब विचारतील असा थेट इशारा पालकांच्या शिष्टमंडळाने दिला आहे.

# घाटशिळा विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी एम.बी.सानप

## विद्यालयात उत्साहात स्वागत

आष्टी (एस.राजेंद्र लाड)

बीड येथील प्रगती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शिरूर का. तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथील घाटशिळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या नूतन मुख्याध्यापकपदा चा पदभार एम.बी. सानप यांनी नुकताच स्वीकारला. या निमित्ताने विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या छोटेखानी समारंभात विद्यार्थ्यांसह सहकारी शिक्षक बांधवांनी त्यांचे पुष्पहार, शाल आणि श्रीफळ देऊन अत्यंत उत्स्फूर्त आणि उत्साही वातावरणात स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर,



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रसंत भगवान बाबा आणि संत वामनभाऊ यांच्या प्रतिमांना विनम्र अभिवादन करून झाली.

या स्वागत सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक एस. एम. चोले होते. याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष भगवानराव नेहरकर यांनी पालक आणि ग्रामस्थांच्या वतीने नूतन मुख्याध्यापकांचे स्वागत करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात चोले सर यांनी सानप सरांचे अभिनंदन करत त्यांना मार्गदर्शनापर शुभेच्छा दिल्या. तसेच शिक्षक डी. एस. तळेकर आणि आर. के. खेडकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या सोहळ्याला शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष भगवानराव नेहरकर, एस. एम. चोले, प्रा. बी. के. मुंडे, प्रा. एस. ए. बटुळे, प्रा. के. एच. सय्यद, प्रा. बिभिषण चाटे, सी. एम. शिरसाठ, अशोक सांगळे, एन. एस. सानप, परजणे, डी. एस. तळेकर, आर. के. खेडकर, वरिष्ठ लिपिक जी. एम. बांगर, बडे सर, एम. टी. हंगे, पाखरे सर यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी. के. मुंडे यांनी केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख व प्रसिद्ध निवेदक प्रा. बिभिषण चाटे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले तर शेवटी प्रा. एस. ए. बटूळे यांनी सर्वांचे आभार मानले.

सर्व सहकारी शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या खंबीर सहकार्यातून आपण विद्यार्थ्यांच्या ज्ञानदानाचा आणि प्रगतीचा हा प्रवास अधिक यशस्वी करूया. एम.बी. सानप (नूतन मुख्याध्यापक)

# मराठवाडा भूषण लोकनेते आ.सुरेश आण्णा धस यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## व्हीबी-जी-रामजी नव्या रोजगार हमी योजनेत ग्रामपंचायतींच्या २० कामांवरील अट शिथिल

आष्टी (एस.राजेंद्र लाड)

ग्रामीण भागातील रोजगार, विकास आणि ग्रामपंचायतींच्या कामांना मोठी चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. व्हीबी-जी-रामजी (विकसित भारत - रोजगार आणि आजीविका हमी मिशन - ग्रामीण) या नव्या रोजगार हमी योजनेत वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाच्या कामांवरील अटी शिथिल करण्यात आल्या असून ग्रामीण कुटुंबांना वर्षाकाठी शंभर दिवसांऐवजी एकशे पंचवीस दिवस अकुशल रोजगाराची कायदेशीर हमी देण्यात आली आहे. या निर्णयासाठी आ. सुरेश आण्णा धस यांनी विधिमंडळात सातत्याने आवाज उठवत प्रभावी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने ग्रामीण भागात समाधान व्यक्त होत आहे.



ग्रामीण भागातील अनेक विकासकामे विविध नियम व अटींमुळे रखडत असल्याची बाब आ. सुरेश आण्णा धस यांनी विधिमंडळात ठामपणे मांडली होती. ग्रामपंचायतींना अधिक स्वातंत्र्य मिळावे, रोजगार हमीची कामे वेगाने सुरू व्हावीत आणि शेतकरी, शेतमजूर तसेच सर्वसामान्य ग्रामीण कुटुंबांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी त्यांनी सातत्याने केंद्र व राज्य शासन स्तरावर पाठपुरावा केला होता.

या पाठपुराव्याची दखल घेत केंद्र शासनाने व्हीबी-ग्राम-जी योजनेअंतर्गत महत्त्वपूर्ण बदल करत वैयक्तिक व सार्वजनिक कामांवरील अटी शिथिल केल्या आहेत. तसेच ग्रामीण कुटुंबांना मिळणाऱ्या रोजगाराच्या दिवसांमध्ये वाढ करून शंभर दिवसांवरून एकशे पंचवीस दिवसांची कायदेशीर हमी देण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींना विकासकामे राबविताना अधिक सुलभता मिळणार असून जलसंधारण, मृदसंधारण, वृक्षलागवड, ग्रामीण रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि रोजगारनिर्मितीची विविध कामे अधिक वेगाने पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयामुळे राज्यातील ग्रामपंचायतींना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामीण विकासाला नवी गती मिळणार आहे. रोजगाराच्या वाढीव संधीमुळे हजारो ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ मिळणार असून, आ. सुरेश आण्णा धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे महत्त्वपूर्ण यश मानले जात असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

# आष्टी महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता पदावर राहुल जायभाये यांची नियुक्ती

## अनुभवी अधिकाऱ्याच्या पुनरागमनाने तालुक्यात आनंदाचे वातावरण

आष्टी (एस.राजेंद्र लाड) महावितरण कंपनीच्या आष्टी उपविभागाच्या उपकार्यकारी अभियंता पदावर राहुल भाऊराव जायभाये यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या नियुक्तीमुळे आष्टी तालुक्यातील वीज ग्राहक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी आष्टी येथे शाखा अभियंता म्हणून कार्यरत असताना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांच्याबद्दल नागरिकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण झाले होते. त्यामुळे पुन्हा एकदा आष्टीच्या सेवेत त्यांचे पुनरागमन झाल्याने महावितरणच्या कामकाजाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

राहुल जायभाये यांनी आपल्या सेवाकाळात नेहमीच प्रामाणिकपणा, शिस्त, पारदर्शकता आणि लोकाभिमुख प्रशासनाला प्राधान्य दिले आहे. ग्राहकांच्या अडचणी तात्काळ सोडविणे, वीज पुरवठा सुरळीत ठेवणे, तांत्रिक बिघाडांवर जलद उपाययोजना करणे तसेच कार्यालयीन कामकाजात कार्यक्षमता वाढविणे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या याच कार्यपद्धतीची दखल घेत महावितरण प्रशासनाने त्यांच्यावर उपकार्यकारी अभियंता पदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

राहुल भाऊराव जायभाये यांनी आष्टी येथे शाखा अभियंता म्हणून कार्यरत असताना अनेक विकासात्मक उपक्रम राबविले. ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. ग्राहकांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण, थकीत कामे मार्गी लावणे, वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा करणे तसेच कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय निर्माण करून प्रभावी प्रशासन उभे करण्याचे काम त्यांनी केले. यानंतर त्यांची बदली संभाजीनगर येथील विद्युत चोरी प्रतिबंधक पथकात झाली. या ठिकाणी त्यांनी वीज चोरी रोखण्यासाठी प्रभावी मोहिमा राबवून महावितरणच्या महसूल संरक्षणात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यानंतर लातूर, बीड आणि संभाजीनगर येथे विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी आपल्या अनुभवात अधिक भर घालत प्रशासनातील कुशल अधिकारी म्हणून वेगळी ओळख निर्माण केली.

या सर्व अनुभवाच्या आधारे आता त्यांच्यावर आष्टी उपविभागाच्या उपकार्यकारी अभियंता पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राहुल जायभाये हे आष्टी तालुक्यातील पांगरा गावचे सुपुत्र असून ते आष्टी परिसरातील आदर्श शिक्षक भाऊराव जायभाये यांचे चिरंजीव आहेत. शिक्षक कुटुंबात वाढल्यामुळे त्यांच्यावर लहानपणापासूनच प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी, कर्तव्यनिष्ठा आणि शिस्त यांचे संस्कार झाले. उच्च शिक्षणासोबतच प्रशासकीय कौशल्य विकसित करत त्यांनी महावितरणमध्ये आपल्या गुणवत्तेच्या बळावर उल्लेखनीय यश मिळविले.

राहुल जायभाये यांनी यापूर्वी आष्टी येथे काम केल्यामुळे तालुक्याच्या भौगोलिक परिस्थितीची,



ग्रामीण भागातील वीज वितरण यंत्रणेची, शेतीपंपांच्या समस्या, वाढती वीज मागणी, वारंवार उद्भवणारे तांत्रिक अडथळे तसेच ग्राहकांच्या अपेक्षांची त्यांना सखोल माहिती आहे. त्यामुळे नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर निर्णयप्रक्रियेत वेग येऊन विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महावितरणच्या माध्यमातून ग्राहकांना दर्जेदार, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा मिळावी, यासाठी राहुल जायभाये कटिबद्ध असल्याचे त्यांच्या पूर्वीच्या कामकाजातून दिसून आले आहे. वीज पुरवठा अधिक सुरळीत करणे, बिघाडांवर तातडीने उपाययोजना करणे, ग्राहकांच्या तक्रारींचे जलद निवारण, महसूल वसुली वाढविणे, वीज चोरीवर नियंत्रण ठेवणे आणि ग्रामीण भागातील सेवा अधिक सक्षम करणे, यावर ते विशेष भर देतील, अशी अपेक्षा आहे.

आष्टी उपविभागात शेती, उद्योग, व्यापारी प्रतिष्ठाने आणि घरगुती ग्राहकांची संख्या मोठी आहे. अशा परिस्थितीत अनुभवी अधिकाऱ्याच्या नेतृत्वामुळे कार्यालयीन समन्वय वाढेल, कर्मचाऱ्यांमध्ये कार्यक्षमता निर्माण होईल आणि ग्राहकांना अधिक दर्जेदार सेवा मिळण्यास मदत होईल. भविष्यातील विकासकामे, नवीन वीज जोडण्या, देखभाल-दुरुस्तीची कामे तसेच आपत्कालीन परिस्थितीत जलद प्रतिसाद देण्यासाठी त्यांचा अनुभव महत्त्वाचा ठरणार आहे.

राहुल भाऊराव जायभाये यांच्या नियुक्तीनंतर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, व्यापारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. मित्रपरिवार, सहकारी अधिकारी, कर्मचारी आणि आष्टी तालुक्यातील नागरिकांनी त्यांना नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या असून, त्यांच्या नेतृत्वाखाली आष्टी उपविभागातील महावितरणचे कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे आष्टी तालुक्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम होऊन ग्राहकांना दर्जेदार, तत्पर आणि विश्वासार्ह सेवा मिळेल, अशी अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

# आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.रामदास मोराळे यांच्या मातोश्री काशीबाई मोराळे यांचे दु:खद निधन

बाणेगाव येथे अंत्यसंस्कार संपन्न

आष्टी (एस.राजेंद्र लाड)

आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. रामदास मोराळे व केंद्रप्रमुख श्रीमती उषा मोराळे यांच्या मातोश्री काशीबाई सखाराम मोराळे (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच वैद्यकीय क्षेत्रासह सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हळहळ व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.प्रेमळ, शांत, संयमी आणि कुटुंबवत्सल स्वभावामुळे काशीबाई मोराळे यांना परिसरात विशेष मान होता.



त्यांनी आपल्या कुटुंबावर उत्तम संस्कार करत आयुष्यभर साधेपणा, कष्ट आणि मूल्याधिष्ठित जीवनाचा आदर्श ठेवला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मोराळे कुटुंबाने समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या निधनामुळे मोराळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईक, मित्रपरिवार, सहकारी तसेच विविध क्षेत्रांतील नागरिकांकडून शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत.

त्यांच्यावर दि. ७ जुलै २०२६ रोजी रात्री ११ वाजता त्यांच्या मूळ गावी बाणेगाव, ता. केज, जि. बीड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस नातेवाईक, मित्रपरिवार, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काशीबाई मोराळे यांच्या पश्चात श्रीमती केशर दराडे, श्रीमती कस्तुरा तांबडे, श्रीमती सुनिता आंधळे, श्रीमती अनिता गोपाळघरे, श्रीमती आशा दराडे, श्रीमती उषा केदार, श्रीमती प्रणिता बासर या सात मुली, डॉ. रामदास मोराळे हे एक पुत्र तसेच नातवंडे असा परिवार आहे.

डॉ. रामदास मोराळे व श्रीमती उषा मोराळे यांच्या दुःखात सहभागी होत विविध स्तरांतील मान्यवरांनी काशीबाई मोराळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. ईश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो आणि मोराळे परिवारास हे अपरिमित दुःख सहन करण्याचे बळ प्रदान करो, अशी प्रार्थना सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे.

# आ.सुरेश धस यांनीच दूध भेसळीविरोधात सर्वाधिक आवाज उठवला

## दूध भेसळ प्रकरणात नाव न घेता माझी बदनामी करण्याचा प्रयत्न;पसरवल्या जाणाऱ्या अफवा निराधार-प्राजक्ताताई धस

आष्टी (एस.राजेंद्र लाड)

राज्यात दूध भेसळीविरोधात सुरू असलेल्या व्यापक कारवाईच्या पार्श्वभूमीवर काही समाजमाध्यमे व प्रसारमाध्यमांतून नाव न घेता माझ्याबाबत संशय निर्माण करणाऱ्या बातम्या प्रसारित केल्या जात असून त्या पूर्णपणे निराधार, दिशाभूल करणाऱ्या आणि बदनामी करण्याच्या हेतूने प्रसिद्ध केल्या जात असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य दूध सहकारी महासंघ महानंद मुंबईच्या संचालिका प्राजक्ताताई धस यांनी केला आहे.

कोणतेही ठोस पुरावे नसताना सूचक पद्धतीने एखाद्या व्यक्तीला लक्ष्य करणे ही पत्रकारितेच्या नैतिकतेला धरून नसल्याचे सांगत, ज्यांच्याकडे कोणतेही पुरावे असतील त्यांनी ते सार्वजनिक करावेत व संबंधित तपास यंत्रणांकडे सादर करावेत, अन्यथा अशा प्रकारे बदनामी करणाऱ्या बातम्या तातडीने मागे घ्याव्यात, अशी मागणी त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली.

प्राजक्ताताई धस म्हणाल्या की, आ. सुरेश धस यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राज्यात दूध भेसळीविरोधात सर्वाधिक आक्रमकपणे आवाज उठवला आहे. विधानसभेत, विविध चर्चांमध्ये तसेच दुग्धविकास मंत्र्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी वारंवार दूध भेसळीचा प्रश्न उपस्थित केला. दूध भेसळीसारख्या गंभीर गुन्ह्याला आळा घालण्यासाठी कठोर कायदा करण्याचीही त्यांनी सातत्याने मागणी केली. अजामीनपात्र गुन्हा दाखल व्हावा ही मागणी त्यांचीच आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, ही आमची सुरुवातीपासूनची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे दावा केला की, आ. सुरेश धस यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळेच दूध भेसळ करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू झाली असून गुन्हे दाखल



होण्यास गती मिळाली आहे. मात्र, याच कारवाईची धार कमी करण्यासाठी आणि जनतेचे लक्ष मूळ मुद्द्यापासून विचलित करण्यासाठी काही राजकीय व्यक्तींकडून नियोजनबद्ध पद्धतीने अफवा पसरवल्या जात आहेत.

प्राजक्ताताई धस यांनी आरोप केला की, एका राजकीय पक्षाशी संबंधित काही विशिष्ट राजकीय व्यक्ती आ. सुरेश धस यांनी उघड केलेल्या दूध भेसळ प्रकरणाची तीव्रता कमी करण्यासाठी जाणूनबुजून अपप्रचार करत आहेत.

नांदेड जात पडताळणी समिती, कार्यालयात नागरिकांची अडवणूक करणाऱ्या

# श्री. महेंद्र कोसरे कंत्राटी कर्मचाऱ्याच्या हकालपट्टीची सामाजिक कार्यकर्त्या रेखा ढवळे यांची मागणी

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड येथील नागरी सेवा सुविधा केंद्र खिडकी क्र. ०१ वर कार्यरत असलेल्या एका खाजगी कंत्राटी कर्मचाऱ्याकडून येणाऱ्या अभ्यागत, विद्यार्थी आणि पालकांशी गैरवर्तन केले जात असून, त्यांची नाहक अडवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती रेखा बाबुराव ढवळे यांनी दिनांक ७ जुलै २०२६ रोजी समितीच्या अध्यक्षांकडे रीतसर तक्रार निवेदन सादर करून संबंधित कर्मचाऱ्याची नजीकच्या जिल्ह्यात सेवा वर्ग करण्याची आणि त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, खाजगी पुरवठादार एजन्सीमार्फत कार्यरत असलेले प्रकल्प सहाय्यक महेंद्र कोसरे हे जात पडताळणीसाठी येणाऱ्या नागरिकांशी आणि त्यांच्या नातेवाईकांशी उद्धटपणे बोलतात व हुज्जत घालतात. महत्त्वाचे म्हणजे, जात दावा पडताळणी संहिता तसेच 'मानवी दिनांक' बाबत त्यांना कोणतेही सखोल ज्ञान नाही. अनुसूचित जाती आणि इतर मागास प्रवर्गासाठी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर पुराव्यांबाबत विचारणा केली असता, त्यांना कोणतीही माहिती देता आली नाही.

याशिवाय, कार्यालयातील वरिष्ठ लिपिक श्री. सिद्राम रणभिरकर व वरिष्ठ अधिकारी उच्च लघुलेखक मुकिंदा मुळे यांना याबाबत विचारले असता, त्यांनाही याविषयी सखोल माहिती नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अधिकारी पाठीशी घालत असल्याचा आरोप तक्रारदार रेखा ढवळे यांनी या गंभीर प्रकाराबाबत समितीच्या उपायुक्त तथा सदस्य डॉ. छाया कुंडलिकराव कुलाल यांच्याकडे विचारणा केली असता, त्या संबंधित चुका करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे दिसून आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या भूमिकेमुळे जनसामान्यांमध्ये कार्यालयाची प्रतिमा मलिन होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

प्रमुख मागण्या: नागरी सेवा सुविधा केंद्र खिडकी क्र. ०१ वर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची टेबल बदली करा. कर्मचाऱ्याची जिल्हा बदली: गैरवर्तन करणाऱ्या प्रकल्प सहाय्यक महेंद्र कोसरे यांची तात्काळ नजीकच्या जिल्ह्यात सेवा वर्ग करण्यात यावी. त्या ठिकाणी कायमस्वरूपी कर्मचारी नेमावेत: कंपनी क्ट १९६१ च्या नियमांनुसार शासकीय कार्यालयातील महत्त्वाची आणि संवेदनशील जबाबदारी कंत्राटी कर्मचाऱ्यांऐवजी कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांवर सोपवण्यात यावी.

प्रशिक्षणाची गरज: जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'मानवी दिनांक' आणि महसूल नोंदींबाबत योग्य ज्ञान नसल्याने, 'बार्टी, पुणे' (इ-ठढख) मार्फत त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात यावे. या निवेदनाच्या प्रती माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव (मुंबई), समाज कल्याण आयुक्त (पुणे), बार्टीचे महासंचालक (पुणे) आणि नांदेडचे जिल्हाधिकारी यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

# कामठा येथील शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन उगवलेच नाही



**आठ दिवसापूर्वी पेरलेले सोयाबीन अद्याप उगवले नाही**

अर्धापूर (प्रतिनिधी): तालुक्यातील कामठा बु. येथील शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये दोन बॅग सोयाबीनची पेरणी केली पण सोयाबीन निकृष्ट दर्जाचे बियाणे असल्यामुळे उगवले नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी कंपनीच्या विरोधात तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दि. ७ मंगळवारी रोजी केली आहे.

अर्धापूर तालुक्यातील कामठा बु. येथील शेतकरी परमेश्वर विश्वनाथ गाढवे यांनी दि.३० जून रोजी महाबीज या कंपनीचे बियाणे बीबीएफ पद्धतीने यंत्रणाच्या सहाय्याने पेरणी केली होती. सात ते आठ दिवसाचा कालावधी उलटला तरीही त्यांच्या शेतामध्ये बीज अंकुरण झाले नाही. या कंपनीचे बियाणे निकृष्ट असल्याचा दावा करत तालुका कृषी अधिकारी अर्धापूर यांना सदर प्रकरणी पाहणी करून कंपनी विरोधात योग्य ती कारवाई करून नुकसान भरपाई द्यावी या मागणीचे निवेदन शेतकरी परमेश्वर गाढवे यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात दिला आहे.

यावे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना प्रहारचे तालुकाध्यक्ष छगन सांगोळे म्हणाले की महाबीजने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. ऐन हंगामात शेतकऱ्यावर दुबार पेरणीची वेळ आणणाऱ्या बियाणे कंपनीवर तात्काळ गुन्हा दाखल झाला पाहिजे. कृषी विभागाने तत्परतेने बांधावर जाऊन पाहणी करून शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळवून द्यावी अन्यथा प्रहार स्टाईलने कृषी अधिकारी कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडेल जाईल असा इशारा सांगोळे यांनी दिला.

# पावसाने फिरवली पाठ; कोमात खरीप पिके, आभाळाकडे लागल्या बळीराजाच्या आशाळभूत नजरा!

देगलुर प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यासह देगलूर, मुखेड आणि परिसरातील शेतकऱ्यांवर यंदाच्या खरीप हंगामात पुन्हा एकदा संकटाचे सावट गडद झाले आहे. जून महिन्याच्या अखेरीस झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या पूर्ण केल्या. महागडे बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके आणि मशागतीवर हजारो रुपयांचा खर्च करून शिवार हिरवेगार करण्याचे स्वप्न पाहिले. मात्र जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात पावसाने अचानक दडी मारल्याने उगवलेली पिके आता कोमेजू लागली असून अनेक ठिकाणी ती कोमात गेल्याचे चित्र आहे.

सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद या पिकांना सध्या तातडीने पावसाची गरज आहे. परंतु अनेक दिवसांपासून समाधानकारक पाऊस न झाल्याने जमिनीतील ओलावा संपत चालला आहे. उन्हाच्या झळा वाढल्याने पिकांची वाढ खुंटली असून शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे.

आधीच वाढलेले बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचे दर यामुळे शेतीचा खर्च प्रचंड वाढला आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली आहे. आता पाऊस लांबल्यास दुबार पेरणीचे संकट उभे राहण्याची भीती निर्माण झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची शक्यता आहे.

सध्या प्रत्येक शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. पांडुरंगा, आता तरी कृपा कर; बळीराजाच्या शिवारात मुसळधार पाऊस पाड, अशी आर्त प्रार्थना गावागावांतून ऐकू येत आहे. वेळेत चांगला पाऊस



झाला तरच पिकांना नवजीवन मिळेल, अन्यथा शेतकऱ्यांच्या कष्टावर पुन्हा पाणी फिरण्याची भीती व्यक्त होत आहे.

राज्य शासनाने आणि कृषी विभागाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच पाऊस लांबल्यास शेतकऱ्यांना तातडीची मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# एसआयआर संदर्भात अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचा तामसा येथे औचक दौरा

तामसा प्रतिनिधी : विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांनी तामसा येथे औचक भेट देत मतदार नोंदणी प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी तामसा येथील बूथ क्रमांक २६३ ला भेट देऊन मतदारांच्या घरी जाऊन स्वत: एसआयआरचे फॉर्म भरून घेतले व सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला.

या दौऱ्यादरम्यान हदगाव उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, नियंत्रण अधिकारी आर. देशपांडे तसेच मंडळ अधिकारी भाग्यश्री कंदकुर्ते उपस्थित होते. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी मतदारांशी संवाद साधून आवश्यक कागदपत्रे व नोंदणी प्रक्रियेबाबत माहिती घेतली.

यावेळी आयोजित आढावा



बैठकीत डॉ. गायकवाड यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, बीएलओ व बीएलओ सहाय्यकांनी राष्ट्रीय महत्त्वाच्या या कार्यक्रमात जबाबदारीने सहभाग नोंदवावा. कामात दिरंगाई, निष्काळजीपणा अथवा कामचुकारपणा करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. सर्वांनी माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशांचे काटेकोर पालन करून शंभर टक्के काम पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी दिले.कामचुकार बीएलओंना इशारा.पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसा येथे

तामसा शहरात नियुक्त असलेल्या काही बीएलओ व बीएलओ सहाय्यकांच्या कामकाजाबाबत निष्काळजीपणाची बाब निदर्शनास आल्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांनी संबंधितांना कडक शब्दांत सूचना दिल्या. हा राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचा कार्यक्रम असून प्रत्येक बीएलओने सक्रिय सहभाग नोंदवून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशांचे पालन करावे, असे त्यांनी बैठकीत स्पष्ट केले.शिक्षकांना शाळेत बसून डखठ चा काम अपेक्षित आहे असं इज साहेबांनी ग्रुप वर मेसेज टाकल्याने अप्पर जिल्हा अधिकारी यांनी इज ला सक्त आदेश देऊन मेसेज डिलीट करण्याचे आदेश दिले..शिक्षकांना असं प्रवत करणं केंद्र सरकारच्या या राष्ट्रीय कार्यक्रमाचा अवमान आहे तुमच्यावर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते असा आदेश दिले

# विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेस ग्रामस्थांनी सहकार्य करावे- मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील

नांदेड जिल्हा प्रतिनिधी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी मंगळवार दिनांक ७ जुलै रोजी लोहा तालुक्यातील धावरी व पिंपळगाव ढगे या गावांना भेट देऊन विशेष सखोल पुनरिक्षण (डखठ) मोहिमेंतर्गत सुरू असलेल्या गणना पत्रके भरण्याच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी बूथस्तरीय अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या गृहभेटींचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

ग्रामस्थांशी संवाद साधताना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील म्हणाले की, मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे गणना पत्रके भरण्यासाठी गृहभेटी देणाऱ्या बूथस्तरीय अधिकाऱ्यांना नागरिकांनी संपूर्ण सहकार्य करून आवश्यक ती अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी. प्रत्येक पात्र नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

गावातील युवकांनीही या मोहिमेत पुढाकार घेऊन बूथस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. विशेषतः एकाच समाजाची किंवा समान आडनावांची कुटुंबे मोठ्या प्रमाणात असलेल्या गावांमध्ये २० ते २५ युवकांचे स्वयंसेवक गट तयार करून त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. या गटामार्फत गृहभेटी घेऊन नागरिकांना मोहिमेची माहिती देणे, भरलेली गणना पत्रके विहित मुदतीत



संकलित करणे तसेच त्यांची ऑनलाइन नोंदणी वेळेत पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

दौऱ्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल बांधकामांचीही पाहणी केली. लाभार्थ्यांशी संवाद साधून कामाच्या प्रगतीची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, गट विकास अधिकारी कुलकर्णी, नायब तहसीलदार संदीप हडगे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# लोहा शहरात थरार: कौटुंबिक वादातून पत्नीवर गोळीबार; आरोपी पती फरार

लोहा प्रतिनिधी

लोहा: शहरातील शिक्षक कॉलनी परिसरात सोमवारी मध्यरात्री कौटुंबिक वादातून एका पतीने स्वतःच्या पत्नीवर गावठी कट्ट्यातून तब्बल तीन राऊंड गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्राणघातक हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गोळीबारानंतर आरोपी पती घटनास्थळावरून फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल जाधव आणि त्याची पत्नी अर्चना यांच्यात सोमवारी मध्यरात्री कडाक्याचे भांडण झाले. या वादातून विशालने रागाच्या भरात पत्नी अर्चनावर विनापरवाना गावठी कट्ट्यातून सलग तीन गोळ्या झाडल्या. यातील एक गोळी तिच्या कानाला चाटून गेली, तर दुसरी गोळी पाठीत घुसल्याने ती रक्ताच्या थारोळ्यात कोसळली. तिला तातडीने नांदेडला हलवण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक डॉ. नीलम रोहन आणि स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. फॉरेन्सिक आणि फिंगरप्रिंट पथकाने पुरावे संकलित केले आहेत. फरार आरोपी विशालवर यापूर्वी मे २०२५ मध्ये पेट्रोल पंप लुटीचा गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्या शोधासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना केली आहेत.

लोहा शहरात थेट गावठी कट्ट्यातून गोळीबार झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड दहशत निर्माण



झाली आहे. या घटनेनंतर शहरातील वाढता अवैध शस्त्रसाठा आणि गुन्हेगारीवर पोलीस काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**तामसा-हदगाव रस्त्यावर भीषण अपघात**

# हायवा मोटारसायकलच्या धडकेत तरुण जागीच ठार

तामसा - तामसा - हदगाव रस्त्यावरील तळेगाव - कोळगाव फाट्याजवळ हायवा मोटारसायकलच्या भीषण अपघातात मोटार सायकल स्वार तरुण जागीच ठार झाल्याची घटना दि. ८ रोजी बुधवारी दुपारी घडली असून अपघातामुळे एका तरुणाचा मृत्यू झाल्याची बातमी कळताच तामसा परिसरावर शोककळा पसरली असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

तामसा शेतमजुरवाडी येथील विक्की नागेश सोनटक्के (वय ३२ वर्ष) हा बांधकाम मजूर हा मोटार सायकल क्रमांक चक२६, इञ८७३९ घेऊन हदगाववरून तामसाकडे येत होता. त्याचवेळी तामस्याकडून फेवरब्लॉक (गट्टू) घेऊन जाणारा हायवा ट्रक क्रमांक चक २६ इए



१७२२ अत्यंत भरधाव वेगाने हदगावच्या दिशेने जात होता. तळेगाव - कोळगाव फाट्याजवळ दोन्ही वाहनांची समोरासमोर भीषण टक्कर झाली. ही धडक इतकी भीषण होती की, विक्की सोनटक्के यांची मोटारसायकल चुराडा झाली. त्याच्या डोक्याला जबर मार लागला तर दोन्ही पाय कमरेपासून फाकून त्याचा जागीच करुण अंत झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. विक्कीचा मृतदेह तामसा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केला. आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले. केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. अत्यंत शोकाकुल वातावरणात आणि जड अंतःकरणाने त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत विक्कीच्या पश्चात आई, वडील, पत्नी आणि तीन लहान मुले असा परिवार आहे. तो घरातील कर्ता पुरुष असल्याने त्याच्या निधनाने सोनटक्के कुटुंबावर आभाळ कोसळले आहे.

तामसा ते हदगाव या राज्य महामार्गावर अपघातांची मालिका सुरुच आहे. तीन महिन्यांत हा तिसरा भीषण अपघात असून, यामध्ये तिन्हीजणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. संबंधित विभागाने महामार्गावर धोकादायक वळणे, फाट्यांवर अद्याप एकही गतिरोधक किंवा दिशादर्शक/इशारा देणारे फलक लावलेले नाहीत. रस्ते प्रशासनाच्या उदासीनतेमुळे निष्पाप नागरिकांचे बळी जात असल्याचा संतापजनक आरोप नागरिकांतून केला आहे. तामसा पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून हायवा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप असून, प्रशासनाने तातडीने या रस्त्यावर गतिरोधक आणि फलक न लावल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

# नंदीग्राम एक्सप्रेसमध्ये डब्यांची संख्या वाढविण्याची मागणी घेऊन

**किनवटचा युवा कर्तार साबळे थेट केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे**

किनवट । प्रतिनिधी । दि. ८ : किनवट तालुक्यातील उच्चशिक्षित युवा तथा वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार यांचे दिल्लीस्थित स्वीय सहाय्यक कर्तार साबळे यांनी मुंबई-बल्लारशाह-मुंबई (गाडी क्रमांक ११००१/११००२) नंदीग्राम एक्सप्रेसमध्ये एलएचबी (एल.एच.बी.) कोच लागू झाल्यानंतर प्रवाशांच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर डब्यांची संख्या वाढविण्याची मागणी करत केंद्रीय रेल्वेमंत्री श्री अश्विनी वैष्णव यांच्या कार्यालयामार्फत रेल्वे बोर्डाकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, १५ जून २०२६ पासून नंदीग्राम एक्सप्रेसमध्ये आधुनिक व सुरक्षित एलएचबी कोचांचा समावेश करण्यात आला असून हा निर्णय प्रवाशांच्या दृष्टीने स्वागतार्ह आहे. या निर्णयाबद्दल त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभारही व्यक्त केले आहेत. मात्र एलएचबी रेक लागू केल्यानंतर या गाडीतील एकूण डब्यांची संख्या १८ वरून १६ करण्यात आली असून विशेषतः स्लीपर श्रेणीतील डबे ८ वरून केवळ ५ करण्यात आल्याने सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, तेलंगणा आणि बल्लारशाह परिसराला जोडणारी नंदीग्राम एक्सप्रेस ही अत्यंत महत्त्वाची रेल्वे सेवा आहे. या गाडीमधून दररोज विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार, व्यापारी तसेच सामान्य व मध्यमवर्गीय नागरिक मोठ्या प्रमाणावर प्रवास करतात. वर्षभर या गाडीला मोठी गर्दी असून आरक्षणासाठी प्रतीक्षा यादीही मोठी असते. अशा परिस्थितीत स्लीपर कोचांची संख्या कमी झाल्यामुळे प्रवाशांची गैरसोय अधिकच वाढल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे रेल्वे प्रशासनाने जनहिताचा विचार करून या गाडीची कोच संरचना वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार एक प्रथम वातानुकूलित (एसी फर्स्ट क्लास), दोन द्वितीय वातानुकूलित (एसी टू-टियर), तीन तृतीय वातानुकूलित (एसी थ्री-टियर), पाच एसी इकॉनॉमी तसेच आठ स्लीपर श्रेणीचे डबे उपलब्ध करून देण्याची विनंती रेल्वे बोर्डाकडे करण्यात आली आहे. करतार साबळे हे मूळचे किनवट तालुक्यातील असून सध्या दिल्ली येथे खासदारांचे स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची आई चंद्रपूर तांडा येथील उपसरपंच असून स्थानिक सामाजिक व विकासकामांमध्येही त्यांचे कुटुंब सक्रिय आहे. दिल्लीमध्ये महत्त्वाच्या पदावर कार्यरत असतानाही करतार साबळे यांचे किनवट तालुका व परिसराशी असलेले नाते कायम असून या भागातील रेल्वे, पायाभूत सुविधा व जनहिताच्या प्रश्नांसाठी



ते सातत्याने पाठपुरावा करत असतात. नंदीग्राम एक्सप्रेसमधील डब्यांची संख्या वाढविण्याची त्यांची ही मागणी विदर्भ, मराठवाडा आणि तेलंगणा भागातील लाखो रेल्वे प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात असून रेल्वे मंत्रालय यावर सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.